१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार २० जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०७, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 107 Marathi - Daily - Mumbai, 20 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

अमित शहांच्या दौऱ्यामुळे सामान्यांची कोंडी?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


# यह तो ट्रेलर है! पिक्चर अभी बाकी है

## एकही बंडखोर खासदार उपस्थित नाही



**शिवसेना शिंदे गटाचा ६० वा वर्धापन दिन सोहळा गोरेगाव येथील भव्य 'नेस्को सेंटर' येथे पार पडला. या सोहळ्याला उबाठातून फुटलेले सहा खासदार उपस्थित राहाणार का, याबद्दल मोठी उत्सुकता होती. परंतु या खासदारांपैकी कुणीही आजच्या कार्यक्रमाला उपस्थित नव्हते. या सोहळ्यात भाषण करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'ऑपरेशन टायगर'वरून उबाठाला इशारा देत म्हणाले की, यह तो बस ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है. आगे आगे देखो होता है क्या?**

■ मुंबई

**स्वतःला** टायगर संबोधत एकनाथ शिंदे म्हणाले की, बऱ्याच जणांच्या नजरा आपल्याकडे लागल्या आहेत. एकनाथ शिंदे काय बोलणार? व्यासपीठावर कोण-कोण येणार? काय होणार? अरे, आज यह टायगर आपके सामने खडा है. मी बघतो आहे की, काल-परवापासून कुछ कुत्ते रोज भौंक रहे है, पण कुत्ते झुंड में आकर भौंकते है, शेर अकेला आता है. कुत्ते भौंकते रहते है, टायगर दहाडता और शिकार करता रहता है. ही शिवसेना आहे. आम्ही धर्मवीरांचे विचार घेऊन पुढे चाललो आहोत.

आपल्या भाषणातून शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, केवळ नावात बाळासाहेब असून चालत नाही. तर तुमच्या मनात, विचारात आणि कामात असावे लागतात. हे बाळासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. ते आम्ही आवडत्या उपक्रमांनी साजरे करणार आहोत. रक्ताचे नाते सांगून, सातबारावर आपले नाव लावून कुणाला वारस होता येत नाही. शिवसेना म्हणजे जमिनीचा तुकडा नाही. शिवसेना म्हणजे विचारांचा आणि आमच्या-तुमच्या काळजाचा तुकडा आहे. शिवसेना राजकीय पक्ष नाही, तर भगवे वादळ आहे. जो भगव्याला विसरला, तो राजकारणातून संपला, हे आपण पाहिलेले आहे. खुर्चीसाठी तुम्ही बाळासाहेबांचे विचार, हिंदुत्व सोडले. बाळासाहेबांच्या हयातीत तर त्यांना त्रास दिला, पण त्यांच्या जाण्यानंतरदेखील बाळासाहेबांना ज्यांचा तिरस्कार होता, त्यांचा पुरस्कार तुम्ही करत आहात. ही तुमची वारसदारी. ज्यांनी बाळासाहेबांची शिवसेना वाचवण्याचे काम केले. जिवापाड शिवसेनेवर प्रेम केले. आज महाराष्ट्रात बाळासाहेबांचे विचार जिवंत ठेवण्याचे काम केले, त्यांना तुम्ही शिव्या देत आहात. हा कुठला न्याय? शिवसेना पहिल्यांदा कुणी फोडली? राष्ट्रवादीने. दुसऱ्यांदा कुणी फोडली? काँग्रेसने. त्यांच्यासाठी ओव्या गात आहेत. ज्यांनी गहाण टाकलेला धनुष्यबाण सोडवला, शिवसेनेचा विचार पुढे नेण्याचे काम केले, त्यांना तुम्ही शिव्या देत आहात.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, आम्ही पान ३ वर

# पक्षप्रमुखपद सोडण्यास मी तयार
## मात्र शिवसेना दरोडेखोरांकडे जाऊ नये

**उबाठाचे सहा खासदार फुटण्याच्या पार्श्वभूमीवर माटुंग्याच्या षण्मुखानंद सभागृहात आज शिवसेनेच्या ६०वा वर्धापन दिन साजरा करताना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना भावनिक साद घातली. ते म्हणाले की, शिवसैनिकांनो, माझ्यावरील सर्व आरोप खरे असतील, असे तुम्हाला वाटत असेल तर मी आता पक्षप्रमुखपद सोडण्यास तयार आहे. मात्र माझी एकच अट आहे की, माझी सोन्यासारखी शिवसेना दरोडेखोर आणि चोरांच्या हातात गेली नाही पाहिजे.**



■ मुंबई

**उद्धव ठाकरे** म्हणाले की, आज जी गद्दारी झाली आहे. मी त्या त्या वार्डातील तमाम मतदारांची जाहीर माफी मागतो. कारण त्या सर्व मतदारांनी अगदी मोदींची लाट असताना माझ्यावर आणि बाळासाहेबांवर विश्वास ठेवून त्यांना निवडून दिले होते. आम्हाला डिवचले जात होते की, तुमचे खासदार मोदींच्या चेहऱ्यावर निवडून आले आहेत. मोदींचा चेहरा न वापरता आपल्या शिवसेनेचे ९ खासदार डौलाने निवडून आले होते. आज परत फोडाफोडी कशासाठी? काय मिळवायचे तुम्हाला? बंगालमध्ये एका महिलेला हरवण्यासाठी दोन-अडीच सीमा सुरक्षा दल घुसवले. स्वतःचा पक्ष जिंकवण्यासाठी देशाचे सुरक्षा दल तुम्ही वापरता? याबाबत कुणालाच काही वाटत नाही. दोन-अडीच लाख फौज तुम्ही निवडणूक जिंकण्यासाठी वापरता? तर मग ती जळत असलेल्या मणिपूरमध्ये का घुसवत नाही? शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना अटी लादल्या जातात, पण आमदार आणि खासदार विकत घ्यायला कोणतीही अट नाही. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही, पण आमदार-खासदारांचा हमीभाव ठरलेला आहे. आजकाल चोरी पकडली की, चोर त्याला 'ऑपरेशन' म्हणतात. सत्ताधारी मंडळी सत्तेचा वापर करून अशी 'ऑपरेशन' करत असतील, तर आता देशाला वाचवण्यासाठी आपल्याला मिळून भाजपावर शस्त्रक्रिया करावी लागेल आणि 'ऑपरेशन कमळ' करावे लागेल. आम्ही ३० वर्षे भाजपासोबत राहून आम्ही भाजपामध्ये विलीन झालो नाही, तर काँग्रेसमध्ये काय विलीन होणार. उलट मला भीती वाटते की, 'मिंधेसेना'च आता भाजपात विलीन होईल.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, मी शिवसेनेची सुरुवातीपासूनची वाटचाल स्वतः पाहिली आहे. मी आज सर्वात ज्येष्ठ शिवसैनिक आहे. शिवसेनेचा पहिला नारळ फोडला, त्यावेळी मी उपस्थित होतो. मातोश्रीने वाढवायचे आणि त्यांनी फक्त स्वतःचे उखळ पांढरे करायचे, हे आता चालणार नाही. आज काही जणांना स्वतःचे अस्तित्व दाखवण्यासाठी दुसऱ्यांचे बाप चोरावे लागत आहेत. स्वाभिमान असलेल्या शिवसैनिकाच्या रक्तात अशी गद्दारीची भेसळ कशी काय येऊ शकते? आजही काही जण मातोश्रीच्या वैभवावर आणि लोकप्रियतेवर जळत आहेत. तुम्ही स्वतःला खरे सिद्ध केले पान ३ वर

# खासदारांनी पोस्ट, बॅनरवरून उद्धव ठाकरेंचा फोटो काढला

■ मुंबई

**उबाठाच्या** ६ खासदारांनी काल पक्ष सोडला आणि चार वर्षांत उबाठाला फुटीचा दुसरा धक्का बसला. या खासदारांनी आज त्यांच्या समाजमाध्यमावरून उद्धव ठाकरे यांचा फोटो आणि मशाल हे चिन्हही हटवले. मात्र या फुटीर सहा खासदारांपैकी एकाही खासदाराची आपल्या मतदारसंघात परतण्याची आज हिंमत झाली नाही. आजही हे सर्व खासदार सकाळपर्यंत लपून राहिले. फक्त दिल्लीला जाऊन न फुटता परत आलेले नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे हे आपल्या मतदारसंघात परत आले आणि ते परतले तेव्हा त्यांचे असे जंगी स्वागत झाले की त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

आज ६० व्या वर्धापनदिनानिमित्त उबाठाचे बंडखोर खासदारांचे नेतृत्व करणारे परभणीचे खासदार संजय जाधव यांची पोस्ट पान ८ वर

### एका फुटीराला केंद्रात मंत्रिपद बाकीच्यांना २५-२५ कोटी रुपये

संजय राऊत यांचा दावा

शिवसेना उबाठामध्ये चार वर्षांत दुसऱ्यांदा फूट झाल्याच्या पार्श्वभूमीवर आज उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी फुटीर खासदारांवर घणाघाती टीका केली. फुटीरांपैकी एकाला केंद्रात मंत्रिपद आणि बाकीच्यांना प्रत्येकी २५ कोटी रुपये देण्यावर काल रात्री मांडवली झाली आहे, असा दावा राऊत यांनी सकाळच्या पत्रकार परिषदेत केला. उबाठामध्ये चार वर्षांत दुसऱ्यांदा फूट पडल्याबद्दल विचारले असता, याला बंड पान ८ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# कॉकरोच जनता पार्टीचे आज दिल्लीत निर्णायक आंदोलन

■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** परीक्षेतील पेपरफुटी आणि सीबीएसई परीक्षेतील घोटाळ्याला जबाबदार असलेले केंद्रीय शालेय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) उद्या राजधानी दिल्लीत निर्णायक आंदोलन करणार आहे.जोपर्यंत प्रधान यांचा राजीनामा घेतला जात नाही तोपर्यंत मागे हटायचे नाही, असा निर्धार सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके याने केला आहे.

शिक्षण क्षेत्रातील गोंधळ आणि पेपरफुटीविरोधात देशव्यापी आंदोलन छेडलेल्या सीजेपीने आतापर्यंत दिल्लीसह देशातील अनेक शहरांमध्ये आंदोलने केली आहेत. याची सुरुवात ६ जून रोजी दिल्लीतील जंतरमंतरवरून झाली. या आंदोलनाला लडाखचे पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूकही उपस्थित राहिले होते. त्यानंतर ११ जून रोजी पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठ परिसरात आंदोलन करण्यात आले. १२ जून रोजी उत्तर प्रदेशच्या लखनौ येथील इको गार्डनमध्ये, पान ७ वर

# टेलिग्रामवरील तात्पुरती बंदी कायम
## दिल्ली हायकोर्टाचा सरकारला दिलासा

■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** २०२६ च्या पुनर्परीक्षेपूर्वी टेलिग्रामवर घालण्यात आलेल्या तात्पुरत्या बंदीबाबत सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत केंद्र सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने टेलिग्रामची याचिका फेटाळून लावत परीक्षा प्रक्रियेची निष्पक्षता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सरकारला अशा प्रकारची पावले उचलण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे २२ जूनपर्यंत देशभरात टेलिग्रामवरील बंदी कायम राहणार आहे.

जस्टीस तेजस करिया यांच्या एकलपीठाने आज टेलिग्रामची याचिका फेटाळण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. न्यायालयाने म्हटले की, सर्व बाजूंचा विचार केल्यानंतर तातडीची गरज लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक प्रक्रियेचे पालन केले आहे. देशव्यापी वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या पार्श्वभूमीवर सरकारचा निर्णय 'प्रमाणबद्धतेच्या तत्त्वाशी' सुसंगत असून त्यामागे वैध उद्देश आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक त्या मर्यादित उपाययोजना करण्यात आल्याचेही न्यायालयाने नमूद केले.




केंद्र सरकारने न्यायालयात टेलिग्रामच्या तांत्रिक रचनेबाबत काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन पान ७ वर

# मराठा समाजाला येड्यात न काढता निर्णय घ्या! जरांगेंचा लाड यांना इशारा

■ जालना

**भाजपा** आमदार प्रसाद लाड यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे- पाटील यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान लाड यांनी सरकारच्या आतापर्यंतच्या कामांचा संपूर्ण 'प्रोग्रेस रिपोर्ट' कागदपत्रांसह जरांगे यांच्यासमोर सादर केला. यावर जरांगे यांनी सरकारच्या काही निर्णयांचे मोकळेपणाने कौतुक केले. मात्र, शैक्षणिक सवलतींचा जीआर निघूनही शाळांकडून १०० टक्के फी वसुली केली जात असल्याचा दावा करत समाजाला येड्यात न काढता हा विषय एकदाचा मार्गी लावा. अन्यथा शेवटचे आमरण उपोषण करेन, असा इशारा सरकारला दिला.

आमदार प्रसाद लाड म्हणाले की, ३१ मे रोजी मी जरांगेंना भेटलो आणि प्रस्ताव दिल्यानंतर जरांगे यांनी उपोषण सोडले. त्यांचे आभार मानण्यासाठी मी आलो आहे. गेल्या १५ दिवसांत आम्ही वेगाने अध्यादेश काढले आहेत. एमआयडीसीमध्ये मराठा तरुणांना नोकऱ्या देण्याबाबतचे परिपत्रक काढले आहे. आरक्षणाच्या लढ्यात बलिदान दिलेल्या बांधवांच्या कुटुंबांना १० लाख रुपयांची मदत पोहोचवली, हैद्राबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी ६१३ नवीन अर्ज आले आहेत. त्यापैकी पान ७ वर

# मुंबईत बेस्ट कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप
## बससेवा ठप्प! प्रवाशांचे हाल



■ मुंबई

**बेस्ट** उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे मुंबईतील बससेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आहे. दररोज सुमारे २,७६६ बस धावणाऱ्या ताफ्यातून आज सकाळपासून केवळ ३६ बसच रस्त्यावर धावल्याने प्रवाशांचे हाल झालेत. काही ठिकाणी बसवर दगडफेक झाल्याच्या घटनाही घडल्या. मात्र बेस्टने बससेवा सुरळीत ठेवण्याचे प्रयत्न केल्याचे सांगितले.

प्रलंबित मागण्या आणि खासगीकरणाच्या विरोधात बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीने १८ जूनच्या मध्यरात्रीपासून संप पुकारला आहे. त्यामुळे मुंबई सेंट्रल, कुर्ला आगारासह अनेक डेपो बंद असून, शहरात बससेवा जवळपास ठप्प झाली होती. परिणामी, प्रवाशांना रिक्षा-टॅक्सीचा आधार घ्यावा लागला. प्रमुख रेल्वे स्थानकांवर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे मुंबईकरांचे प्रचंड हाल झाले. दरम्यान, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कामगारांची बैठक घेत सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगितले. पुढील आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# न्यूयॉर्कच्या टाईम्स स्क्वेअर येथे गोळीबार
## पर्यटकांमध्ये घबराट! एक जण जखमी

**न्यूयॉर्क** - अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील प्रसिद्ध टाईम्स स्क्वेअर या सर्वात जास्त गजबजलेल्या परिसरात आज दुपारी अचानक झालेल्या गोळीबारामुळे एकच खळबळ उडाली. गोळीबारानंतर पर्यटक आणि नागरिक जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत संशयिताचा पान ७ वर






# 'जिओ'चा सगळ्यात मोठा आयपीओ येणार! कागदपत्रे सेबीला सादर

### मुकेश अंबानींची घोषणा

■ मुंबई

**रिलायन्स** इंडस्ट्रीजने जिओच्या प्रस्तावित आयपीओसाठी आवश्यक ती कागदपत्रे (ड्राफ्ट पेपर्स) आज बाजार नियामक संस्था सेबीला सादर केली. कंपनीच्या आज झालेल्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी ही घोषणा केली. आजवरच्या या देशातील सगळ्यात आयपीओच्या माध्यमातून कंपनी १० रुपये दर्शनी मुल्याचे सुमारे २७ कोटी नवीन शेअर जारी करत बाजारात आणले जाणार आहेत.

रिलायन्स जिओ कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानामध्ये खूप मोठी गुंतवणूक करणार आहे. जिओ जगातील आघाडीच्या ग्लोबल सॅटेलाईट कन्सोर्टियमसोबत भागीदारी करत आहे. लवकरच जिओ भारतासाठी स्वतःचे लोअर अर्थ ऑर्बिट सॅटेलाईट नेटवर्क तयार करण्याच्या दिशेने काम करत आहे. या नेटवर्कसाठी जिओ १३ हजार उपग्रह लोअर अर्थ ऑर्बिटमध्ये स्थापित करणार आहे. पान ७ वर




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

## नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# ...तरच धार्मिक पर्यटनाचा हेतू साध्य

भारताला आध्यात्मिक परंपरेचे प्राचीन वरदान लाभलेल्या व्यक्तिगत स्तरावर, सामाजिक स्तरावर नीतीमूल्यं संस्कृती टिकून राहावी. यासाठी वेगवेगळ्या उपासना, श्रद्धा, भक्ती व्यक्त करण्यासाठी मठ, मंदिरं यांची निर्मिती झाली. ऋषीमुनी, संत महात्म्यांनी तपश्चर्येच्या माध्यमातून ही परंपरा अखंड ठेवण्याचा प्रयत्न केला. एकूण भारतीय आध्यात्मिक परंपरेमध्ये साधना आणि नीतमूल्यांना सर्वाधिक महत्त्व दिले गेले. काळ बदलत गेला तसा भारतातल्या या आध्यात्मिक परंपरांचे स्वरूप बदलायला लागले आहे. पूर्वी प्रत्येक गावातलं मंदिर हे तिथल्या साधनशुचिता आणि सभ्यतेचं निदर्शक मानलं जायचं. मंदिरांमधल्या उपक्रमांमधून त्या त्या गावाची समाजव्यवस्था टिकून राहत असे. परंतु आता बदललेल्या परिस्थितीत भारतातील अध्यात्म हे साधना, या प्रकारापेक्षा भौतिक समाधान मिळवण्यासाठी आणि धार्मिक पर्यटनासाठी अधिक प्रसिद्ध होते आहे. अगदी गेल्या काही वर्षातल्या घडामोडी बघितल्या तर देशातल्या सगळ्या प्रमुख मंदिरांमध्ये लोकांची गर्दी झालेली पाहायला मिळते. अगदी चारधाम यात्रेपासून ते सगळ्याच राज्यांमधल्या प्रमुख मंदिरांच्या दर्शनासाठी रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. शासकीय स्तरावरसुद्धा या धार्मिक पर्यटनाला जोरदार प्रोत्साहन दिले जाते आहे. जिथे श्रद्धाळूंची सर्वाधिक गर्दी होते त्या मंदिरांचा परिसर अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न होतो. येणाऱ्या दर्शनार्थींच्या सोयीसुविधा लक्षात घेऊन त्या ठिकाणी बांधले जात असलेले कॉरिडॉर आणि त्या त्या ठिकाणी प्रवासाच्या अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. अगदी महाराष्ट्रातसुद्धा भीमाशंकर असेल, त्र्यंबकेश्वर असेल किंवा आता कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक असेल. शिर्डी आणि साडेतीन शक्तीपीठं असतील. या ठिकाणी सुधारणा केल्या जात आहेत. कोल्हापूरच्या अंबाबाईचा परिसरही विकसित होत आहे. देशाच्या गृहमंत्र्यांच्या हस्ते तिथल्या विकासकामांचे अलिकडेच उद्घाटन झाले. शिवाय राज्यामध्ये याच तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तीमार्गदेखील बांधला जातो आहे. मंदिरांचा परिसर भाविकांच्या सोयीसाठी सुधारणे किंवा सुरक्षित करणे आवश्यक होतेच. परंतु ज्या ठिकाणी ही मंदिरं आहेत. तिथल्या पंचक्रोशीची किंवा त्या त्या गावाची दुर्दशा मात्र तशीच कायम राहते.

### मंदिर परिसरातली दुर्दशा

विशेषतः गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारने केदारनाथ, बद्रीनाथ शिवाय काशीचे विश्वनाथ मंदिर, उज्जैनचे महांकालेश्वर मंदिर या ठिकाणच्या विकासकामांना प्राधान्य दिले. प्रामुख्याने अधिकाधिक लोक या धार्मिक पर्यटनाचा उद्देश ठेवूनच या सुधारणा केल्या गेल्या. या पर्यटनाच्यानिमित्ताने स्थानिक स्तरावरचा रोजगार किंवा व्यवसाय भलेही वाढला असेल. परंतु त्या त्या गावातल्या मूलभूत सोयीसुविधांना हवे तेवढे प्राधान्य मिळालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. अगदी अयोध्येमध्ये प्रचंड संघर्षानंतर भव्य राममंदिर उभारले गेले. हे राममंदिर अनेक दृष्टींनी कसे आदर्श स्वरूपाचे आहे हे दाखवण्याचा प्रयत्न होतो आहे. मंदिर बांधकामासाठी कोट्यवधीचा खर्च केला गेला आणि अजूनही केला जातो आहे. परंतु मंदिराबाहेरच्या परिसराची परिस्थिती अत्यंत दुर्दैवी स्वरूपाची पाहायला मिळते. देशभरातून रोज लाखोच्या संख्येने लोक अयोध्येला येतात. राममंदिर पाहतात. राममंदिर पाहून त्यांना समाधानही वाटते. परंतु मूळ अयोध्या किंवा अयोध्या शहर स्वच्छतेपासून ते स्वच्छ पाणी पुरवठापर्यंत अनेक सुविधांनी वंचित आहे. प्रचंड खर्च करून मंदिरं उभी राहतात. त्यांच्या आजुबाजूचा कॉरिडॉरही सजवला जातो. तिथल्या रोजगारामध्ये काही प्रमाणात वाढ होते. तरीदेखील त्या त्या गावाचे आर्थिक आणि काही सामाजिक प्रश्न कायम राहतात. ज्या पद्धतीने धार्मिक पर्यटनाला बळ किंवा प्रोत्साहन दिले जाते आहे त्या तुलनेमध्ये त्या त्या गावची किंवा तिथल्या लोकांची आर्थिक किंवा सामाजिक उन्नती झालेली दिसून येत नाही. खरे तर आता या सगळ्या ठिकाणी पर्यटन म्हणून येणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. तिथल्या स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपालिकांच्या उत्पन्नातही घट पडलेली आहे. शिवाय मंदिरांच्या दानपेट्यांमध्ये भरपूर रक्कम जमा होत असते. अशीच परिस्थिती इतर धर्मियांच्या प्रार्थनास्थळांबाबतही आहे. परंतु अगदी त्या मंदिराच्या आजुबाजूला पाच दहा किलोमीटरचा परिघसुद्धा स्वच्छ नसतो. वर्षानुवर्षे तिथल्या गैरसोयी तशाच असल्याच्या पाहायला मिळतात.

### सतत वाढणारी संख्या

पर्यटनाच्यानिमित्ताने का होईना परंतु मंदिरांना भेट देणाऱ्यांची संख्या वाढत असेल तर ती चांगली गोष्ट आहे. परंतु या सकारात्मक परिस्थितीचा मंदिर परिसर आणि त्या गावांच्या विकासासाठी उपयोग झाला पाहिजे. अगदी महाराष्ट्रातसुद्धा पंढरपूर, शिर्डी याठिकाणी लाखो भक्त येतात. मंदिर परिसर चांगला असो. परंतु त्या बाहेरची दुरावस्था म्हणजे त्या त्या तीर्थक्षेत्राच्या पावित्र्यालाही धक्का देणारी ठरते. यासाठी सरकारने योजना आखताना त्या गावाच्या विकासाचा आराखडाही तयार केला पाहिजे. तिथली सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारेल. तिथल्या लोकांचे जीवनमान उंचावेल, असा जाणीपूर्वक प्रयत्न होण्याची आवश्यता आहे. विशेष म्हणजे त्या त्या ठिकाणच्या मंदिरांच्या विश्वस्त मंडळांनी स्थानिक सुधारणांसाठी नियोजनपूर्वक पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. अगदी गावातल्या काही महत्त्वाच्या सोयीसुविधांची जबाबदारी मंदिरांनी घ्यायलाही हरकत नाही. मग त्या गावची स्वच्छता असेल शाळा, महाविद्यालयं, रुग्णालयं, रस्ते, चांगल्या पाण्याची व्यवस्था या योजना मंदिरांनी पुढाकार घेऊन दत्तक स्वरूपात घ्यायलाही हरकत नाही. मंदिरांकडे जमा होणाऱ्या निधीचा त्या त्या तीर्थक्षेत्राच्या स्थानिक विकासासाठी उपयोग करता येऊ शकतो. म्हणजे तिथल्या स्थानिक, सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये मंदिरांचा सहभाग मोठी भूमिका पार पाडू शकतो. बदललेल्या काळानुसार आध्यात्मिकता ही भौतिक सोयीसुविधा आणि पर्यटनाला प्राधान्य देताना दिसून येते. अशा परिस्थितीत अधिकाधिक आधुनिक सोयीसुविधा मंदिर असलेल्या शहरांना आणि गावांना उपलब्ध झाल्या पाहिजेत. तरच या वाढत्या धार्मिक पर्यटनाचा सकारात्मक उपयोग झाला असे म्हणता येईल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

ज्याच्यात अहंकार असतो, तोच इतरांना कमी लेखतो.
पण ज्याच्यात संस्कार असतात, तो प्रत्येकाचा आदर करतो.

## पंचांग

**शनिवार, २० जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल षष्ठी**
**नक्षत्र : मघा**





**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-१७**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० सिंह**

**अरण्य षष्ठी, विंध्यवासिनी पूजा, चांगदेव महाराज यात्रा-पुणतांबे**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८७०८११६४२३, ८७०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### चपातीचा चिजी पनीर टॅको



★ **साहित्य :-** ४ ते ५ उरलेल्या चपाती किंवा ताज्या चपात्या, २०० ग्रॅम पनीर (लहान चौकोनी तुकडे), १ बारीक चिरलेला कांदा, १ बारीक चिरलेली ढोबळी मिरची, अर्धा कप उकडलेले स्वीट कॉर्न, २ चमचे मेयोनेज, २ चमचे टोमॅटो सॉस, १ चमचा हिरवी चटणी, अर्धा चमचा चिली फ्लेक्स, अर्धा चमचा ओरिगॅनो, चिमूटभर काळी मिरी पावडर, चवीनुसार मीठ, अर्धा कप किसलेले चीज, भाजण्यासाठी बटर किंवा तेल.

★ **कृती :-** सुरुवातीला एका पॅनमध्ये थोडे बटर किंवा तेल गरम करा. त्यात चिरलेला कांदा घालून हलका गुलाबी होईपर्यंत परता. त्यानंतर ढोबळी मिरची आणि उकडलेले कॉर्न घालून दोन मिनिटे परता. भाज्यांचा कुरकुरीतपणा कायम राहील याची काळजी घ्या.

आता यात पनीरचे तुकडे, चिली फ्लेक्स, ओरिगॅनो, काळी मिरी आणि मीठ घालून सर्व साहित्य व्यवस्थित मिसळा. एक-दोन मिनिटे परतल्यानंतर गॅस बंद करा. टॅकोसाठीची स्वादिष्ट स्टफिंग तयार होईल. यानंतर एका छोट्या बाऊलमध्ये मेयोनेज, टोमॅटो सॉस आणि हिरवी चटणी एकत्र करून क्रीमी आणि चटपटीत सॉस तयार करा. आता एक पोळी घेऊन तिच्या अर्ध्या भागावर हा सॉस लावा. त्यावर तयार केलेले पनीर-भाजीचे मिश्रण भरपूर प्रमाणात पसरवा. वरून किसलेले चीज घाला. पोळीचा दुसरा भाग स्टफिंगवर दुमडून अर्धचंद्राकार आकार द्या. तवा गरम करून त्यावर थोडे बटर लावा. तयार टॅको दोन्ही बाजूंनी मंद आचेवर भाजून घ्या. पोळी कुरकुरीत होईपर्यंत आणि आतील चीज छान वितळेपर्यंत भाजत राहा. तयार टॅको गरमागरम सर्व्ह करा. टोमॅटो सॉस, पुदिन्याची चटणी किंवा चीज डिपसोबत त्याची चव आणखी वाढते.




# यजमान मेक्सिकोची विजयासह बाद फेरीत धडक

## गोलरक्षकाच्या चुकीमुळे द. कोरियाचा १-० ने पराभव




**ग्वादलहारा स्टेडियममध्ये झालेल्या फिफा विश्वचषकाच्या 'अ' गटातील सामन्यात यजमान मेक्सिकोने दक्षिण कोरियाला १-० ने पराभूत करून ३२ संघांच्या फेरीत प्रवेश केला. ५० व्या मिनिटाला लुईस रोमोने मेक्सिकोचा एकमेव गोल केला. हा मेक्सिकोचा सलग दुसरा विजय होता, तर दक्षिण कोरियाला दोन सामन्यांमधील पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले. मेक्सिकोचे आता ६ गुण झाले आहेत, तर दक्षिण कोरियाचे ३ गुण आहेत.**

■ ग्वादलहारा

**पहिल्या** हाफमध्ये दोन्ही संघांना संधी मिळाल्या, पण कोणालाही गोल करता आला नाही. मेक्सिकोकडे चेंडूचा ताबा जास्त होता, तर सोन ह्युंग-मिन आणि त्याच्या संघाने दक्षिण कोरियाकडून प्रति-आक्रमणाचा धोका निर्माण केला होता. दोन्ही संघांचे प्रयत्न अयशस्वी ठरले आणि पहिला हाफ गोलशून्य बरोबरीत संपला.

दुसऱ्या हाफच्या सुरुवातीलाच अवघ्या पाच मिनिटांत कोरियन गोलरक्षक किम सेउंग-ग्यूने गोलजवळ एक मोठी चूक केली, त्याच्या हातातून चेंडू निसटल्यामुळे लुईस रोमोला ५० व्या मिनिटाला गोल करण्याची संधी मिळाली आणि मेक्सिकोला आघाडी मिळाली. त्यानंतर दक्षिण कोरियाने जोरदार हल्ला चढवला आणि गोल करण्याचे अनेक प्रयत्न केले. परंतु मेक्सिकोच्या गोलरक्षकाने आणि बचावपटूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. दुसऱ्या हाफच्या ७६ व्या मिनिटाला ह्वांग ही-चानने दक्षिण कोरियासाठी एक सुवर्णसंधी गमावली, तर दुसरीकडे ली कांग-इन आणि चो गु-संग यांनी मेक्सिकन बचावफळीवर दबाव कायम ठेवला होता. सामन्यातील निर्णायक क्षण ८७ व्या मिनिटाला आला, जेव्हा गोलरक्षक राऊल रँगेलने जवळून मारलेला चोचा हेडर अप्रतिमरित्या अडवला. मेक्सिकोने अतिरिक्त वेळेच्या सहा मिनिटांत आघाडी कायम ठेवली आणि आपले स्थान निश्चित केले, तर दक्षिण कोरियाला गमावलेल्या संधी आणि एका महत्त्वपूर्ण चुकीबद्दल पश्चात्ताप करावा लागला.

**२१ जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| पहाटे १:३० | जर्मनी विरुद्ध आयव्हरी कोस्ट |
| पहाटे ५:३० | इक्वेडोर विरुद्ध कुरासाओ |
| सकाळी ९:३० | जपान विरुद्ध ट्युनिशिया |
| रात्री ९:३० | स्पेन विरुद्ध सौदी अरेबिया |

# दुसऱ्या सामन्यात चेकियाचा विजय हुकला

## द.आफ्रिकेविरुद्ध सामना १-१ने बरोबरीत

■ अटलांटा

**फिफा** विश्वचषकातील गट 'अ' मधील महत्त्वाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिका आणि चेकिया यांच्यात १-१ अशी बरोबरी झाली. अटलांटा स्टेडियमवर झालेल्या या सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात मिळालेल्या पेनल्टीवर तेबोहो मोकोएनाने गोल करत दक्षिण आफ्रिकेच्या बाद फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवल्या. या निकालामुळे दोन्ही संघांच्या खात्यात प्रत्येकी एक गुण जमा झाला. मात्र गटातील बाद फेरीत स्थान मिळवण्यासाठी दोन्ही संघांना आपले अखेरचे सामने जिंकणे जवळपास आवश्यक ठरणार आहे.

सामन्याच्या सुरुवातीलाच चेकियाने आक्रमक खेळ करून आघाडी घेतली. सहाव्या मिनिटाला मिखाल सादिलेकने अचूक फिनिश करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर चेकियाने अनेक संधी निर्माण केल्या. मात्र आघाडी वाढवण्यात त्यांना यश आले नाही. दुसऱ्या हाफमध्ये दक्षिण आफ्रिकेने पुनरागमनाचा प्रयत्न सुरू ठेवला. सामन्याच्या ८३ व्या मिनिटाला थापेलो मासेकोच्या शॉटला चेकिया बचावपटूच्या हाताचा स्पर्श झाल्यानंतर पंचांनी पेनल्टी दिली. या संधीचा फायदा घेऊन तेबोहो मोकोएनाने चेंडू जाळ्यात धाडत सामना १-१ असा बरोबरीत आणला.

# दुखापतग्रस्त श्रेयंकाच्या जागी प्रेमा रावतला संधी

■ लंडन




**भारतीय** महिला संघाची फिरकीपटू श्रेयंका पाटील दुखापतीमुळे टी-२० विश्वचषक स्पर्धेतून बाहेर पडली आहे. तिच्या जागी २४ वर्षीय प्रेमा रावतला संधी दिली. १७ जून रोजी नेदरलँडविरुद्ध सामन्यात क्षेत्ररक्षण करताना श्रेयंकाचा पाय मुरगळला होता.

त्यामुळे तिला मैदानाबाहेर नेण्यासाठी स्ट्रेचरचा वापर करावा लागला होता. प्रेमा रावत आधीपासून भारतीय 'अ' संघासोबत इंग्लंड दौऱ्यावर होती. तिने महिला प्रीमियर लीग आणि आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे.

# जोनाथन डेव्हिडची शानदार हॅट्ट्रिक

## कॅनडाचा कतारवर ६-०ने सहज विजय

■ व्हँकुव्हर

**व्हँकुव्हर** येथील बीसी प्लेस स्टेडियमवर पार पडलेल्या फिफा विश्वचषकाच्या 'ब' गटातील सामन्यात कॅनडाने कतारचा ६-० असा धुव्वा उडवून आपल्या फुटबॉल इतिहासातील सर्वात संस्मरणीय विजय नोंदवला. या विजयामुळे कॅनडाने आपला पहिला विश्वचषक विजय निश्चित केला आणि नॉकआऊट फेरी गाठण्याची आपली शक्यता लक्षणीयरित्या बळकट केली. या सामन्याचा स्टार स्ट्रायकर जोनाथन डेव्हिड होता, ज्याने एक शानदार हॅट्ट्रिक केली. यंदाच्या विश्वचषकात हॅट्ट्रिक करणारा डेव्हिड हा दुसरा खेळाडू ठरला. यापूर्वी अर्जेंटिनाचा स्टार खेळाडू लिओनेल मेस्सीने हा पराक्रम केला होता.

कॅनडाने सुरुवातीपासूनच कतारवर दबाव टाकला. साईल लॅरिनने १६ व्या मिनिटाला गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर डेव्हिडने २९ व्या मिनिटाला आणि पहिल्या हाफच्या इंज्युरी टाईममध्ये गोल करून ३-० अशी आघाडी घेतली. ३३ व्या मिनिटाला होमन अहमदला रेड कार्ड दाखवण्यात आल्याने कतारच्या अडचणी आणखी वाढल्या. दुसऱ्या हाफमध्ये असीम मदिबूलाही रेड कार्ड मिळाल्याने कतारला ९ खेळाडूंसह खेळावे लागले. नॅथन सलिबाने ६४ व्या मिनिटाला चौथा गोल केला, तर मोहम्मद मानाईच्या आत्मघाती गोलमुळे कॅनडाची आघाडी ५-० अशी वाढली. डेव्हिडने अतिरिक्त वेळेत आपला तिसरा गोल करून हॅट्ट्रिक पूर्ण केली. कॅनडाचा ६-० असा विजय हा त्यांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा विश्वचषक विजय ठरला.

# स्वित्झर्लंडने पहिला विजय मिळवला

■ लॉस एंजेलिस

**फिफा** विश्वचषकाच्या 'ब' गटात स्वित्झर्लंडने उत्कृष्ट कामगिरी करून बोस्निया-हर्झेगोविनाचा ४-१ असा पराभव केला. लॉस एंजेलिस स्टेडियमवर झालेल्या या अटीतटीच्या सामन्यात स्विस संघाने शेवटच्या २० मिनिटांत आक्रमक हल्ला चढवत चार गोल केले आणि स्पर्धेतील आपला पहिला विजय निश्चित केला. सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघ सावधपणे खेळले, पण कोणालाही वर्चस्व मिळवता आले नाही. दुसऱ्या हाफमध्ये स्वित्झर्लंडने दबाव वाढवला आणि सामन्याच्या अंतिम टप्प्यात बोस्नियन बचावाला पूर्णपणे खिंडार पाडले. युवा खेळाडू योहान मझांबीने ७४ व्या मिनिटाला एका शानदार गोलने स्वित्झर्लंडसाठी खाते उघडले. ८४ व्या मिनिटाला रुबेन व्हार्गासने ही आघाडी दुप्पट केली. ९० व्या मिनिटाला मझांबीने आपला दुसरा गोल करून ३-० अशी आघाडी घेतली होती.

अनुसूची - १
फॉर्म ए
**जाहीर घोषणा**
*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१७ चे नियम १४ अन्वये)*
**महिंद्रा इलेक्ट्रिकल स्टिल प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | **महिंद्रा इलेक्ट्रिकल स्टिल प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना तारीख | १०.०६.२००९ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट व्यक्तीचे कॉर्पोरेट ओळख क्र. मर्यादित दायित्व ओळख क्र. | U27100MH2009PTC193205 |
| ५ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | महिंद्रा टॉवर्स, पी.के. कुरणे चौक, वरळी, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००१८ |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीची परिसमापन सुरू होण्याची तारीख | १९.०६.२०२६ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, नोंदणी क्र. | अनिश गुप्ता<br>दिवाळखोरी व्यावसायिक<br>१०५ लोटस बिझनेस पार्क, राम बाग लेन, एस व्ही रोड जवळ, मालाड (पश्चिम), मुंबई – ४०००६४<br>दूर.: +९१ ९८२१०९९७२०<br>ईमेल: ipanishgupta@gmail.com<br>नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-002/IP-N00285/2017-18/10843 |
| ८. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १९.०७.२०२६ |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, महिंद्रा इलेक्ट्रिकल स्टिल प्रायव्हेट लिमिटेडने दि.१९.०६.२०२६ रोजी ऐच्छिक दिवाळखोरी सुरू केली आहे.
महिंद्रा इलेक्ट्रिकल स्टिल प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या दाव्यांचा पुरावा, दिनांक १९.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, बाब ७ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर परिसमापकाकडे सादर करावा.
वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करावेत. इतर सर्व भागधारक दाव्यांचे पुरावे प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करू शकतात.
खोटे किंवा दिशाभूल करणारे दाव्यांचे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

सही/-
**अनिश गुप्ता**
**परिसमापक**
ठिकाण: मुंबई
दिनांक: १९.०६.२०२६
**नोंदणी क्र.:** IBBI/IPA-002/IP-N00285/2017-18/10843

फॉर्म ए
**जाहीर घोषणा**
*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)*
**फॅबझेन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशिल | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **फॅबझेन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | **०३ जानेवारी २०१७** |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक - पुणे |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U74999PN2017PTC167807 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | १५ए, चौथा मजला, सिटी व्हिस्टा, टॉवर ए, फाउंटन रोड, खराडी, पुणे - ४११०१४, महाराष्ट्र |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | १८ जून २०२६ |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | १५ डिसेंबर २०२६ (सीआयआरपी प्रारंभ तारखेपासून म्हणजेच १८ जून, २०२६ पासून १८० दिवसांनी) |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **मनिष लालजी दावडा**<br>IBBI/IPA-001/IP-P02506/2021-2022/13797 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | २०५-ए, दुसरा मजला, प्लॉट क्र. ४०८, हिरेन लाइट इंडस्ट्रियल इस्टेट, भागोजी कीर मार्ग, पॅराडाईज सिनेमाजवळ, माहीम, मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००१६. आयबीबीआयसह नोंद. ईमेल आयडी: ip.dawdamanish@gmail.com |
| १० | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | २०५-ए, दुसरा मजला, प्लॉट क्र. ४०८, हिरेन लाइट इंडस्ट्रियल इस्टेट, भागोजी कीर मार्ग, पॅराडाईज सिनेमाजवळ, माहीम, मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००१६. प्रक्रियेकरिता ईमेल आयडी: cirp.fabzen@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | ०२ जुलै, २०२६ (सीआयआरपी सुरू होण्याच्या तारखेपासून म्हणजेच १८ जून, २०२६ पासून १४ दिवसांनी) |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | (अ) वेबलिंक : www.ibbi.gov.in/home/downloads<br>(ब) पत्रव्यवहाराचा ईमेल आयडी : cirp.fabzen@gmail.com |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **फॅबझेन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला १८ जून २०२६ रोजी सुरू करण्याचा आदेश दिला आहे.
फॅबझेन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह ०२ जुलै २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

सही/-
**मनीष लालजी दावडा**
अंतरिम निराकरण व्यावसायिक
**फॅबझेन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड**
IBBI/IPA-001/IP-P-02506/2021-2022/13797
दिनांक: २०.०६.२०२६
ठिकाण: मुंबई
**एएफए क्र.:** एए१/१३७९७/०२/३००६२७/१०९४०६, वैधता ३०.०६.२०२७ पर्यंत
**आयबीबीआयसह नोंदणीकृत पत्ता:** २०५-ए, २रा मजला, प्लॉट क्र.४०८, हिरेन लाईट इंडस्ट्रियल इस्टेट, भागोजी कीर मार्ग, पॅराडाईज सिनेमा जवळ, माहीम, मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००१६
**आयबीबीआय सह नोंद. ईमेल आयडी:** ip.dawdamanish@gmail.com
**पत्रव्यवहारासाठी प्रकल्प-विशिष्ट ईमेल आयडी:** cirp.fabzen@gmail.com

# १ जुलैपासून अहमदाबादमधील मालमत्ता दरांत ५ ते १० टक्के वाढ

■ अहमदाबाद

**१ जुलैपासून** अहमदाबादमधील मालमत्ता दरांत ५ ते १० टक्के वाढ होणार आहे. अहमदाबाद येथे झालेल्या कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन्स ऑफ इंडियाच्या बैठकीत ४०० हून अधिक बांधकाम व्यावसायिकांनी हा अंतिम निर्णय घेतला. बांधकाम साहित्याच्या वाढत्या किमती आणि जागतिक पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे बांधकाम व्यावसायिकांनी हा दरवाढीचा निर्णय घेतला.

या निर्णयामुळे नव्या निवासी व व्यावसायिक प्रकल्पांच्या किमतीत थेट १० टक्के वाढ होईल. सध्या सुरू असलेल्या आणि पूर्णत्वाकडे आलेल्या प्रकल्पांच्या किमतीत बांधकामाच्या टप्प्यानुसार ५ टक्के पर्यंत वाढ केली जाईल.

सिमेंट, स्टील (लोखंड), ल्युमिनियम, विटा आणि टाइल्स यांसारख्या आवश्यक बांधकाम साहित्याचे दर २० ते ६० टक्क वाढले आहेत. काही उत्पादनांच्या किमतीत तब्बल ८०% पर्यंत वाढ झाली आहे. मध्य पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून इंधन आणि आयातीचा खर्च वाढला आहे.

# केरळ विधानसभेत सर्वसामान्यांनाही प्रश्न विचारण्याची परवानगी मिळणार?

■ तिरुवनंतपुरम



**केरळ** विधानसभा एक क्रांतिकारी पाऊल उचलण्याचा विचार करत आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींसाठी राखीव असलेला सभागृहात प्रश्न विचारण्याचा विशेषाधिकार आता सर्वसामान्य नागरिकांनाही देण्याचा प्रस्ताव केरळ विधानसभेत मांडण्यात येणार आहे.

केरळ विधानसभेचे अध्यक्ष तिरुवनचूर राधाकृष्णन यांनी सांगितले की, सामान्य नागरिकांना सभागृहात प्रश्न विचारण्याची परवानगी देण्याच्या प्रस्तावावर विधानसभा विचार करत आहे. प्रस्तावित सुधारणेचा उद्देश विधानसभेला अधिक सहभागी बनवणे असून, केवळ निवडून आलेल्या प्रतिनिधींनाच नव्हे, तर त्यांना निवडून देणाऱ्या लोकांनाही मोठी भूमिका देणे हा आहे.

देश विदेश

# खैबरमध्ये दहशतवाद्यांविरुद्ध विशेष लढाऊ पथक स्थापन

■ पेशावर

**पाकिस्तानच्या** खैबर पख्तूनख्वा पोलिसांनी दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी ४०० जणांचे एक 'विशेष लढाऊ पथक' स्थापन केले आहे. या पथकातील कमांडोजना ९० दिवसांसाठी अतिसंवेदनशील भागात तैनात केले जाईल आणि त्यांना नियमित पोलीस कर्तव्यातून सूट दिली जाणार आहे.

या पथकात ४०० उच्च-प्रशिक्षित पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश असेल, ज्यांची निवड 'एलीट फोर्स'मधून अत्यंत कडक वैद्यकीय, शारीरिक आणि मानसिक चाचण्यांमधून केली जाईल. हे पथक ४५ जणांच्या तुकड्यांमध्ये विभागले जाईल आणि त्यांना ९० दिवसांसाठी प्रांतातील सर्वाधिक संवेदनशील भागात गुप्तचर आधारित कारवाईसाठी पाठवले जाईल.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

९० दिवसांच्या कार्यकाळानंतर या कमांडोजना पुढील ३० दिवसांच्या अत्यंत कठोर प्रशिक्षणासाठी नौशेरा येथील 'एलीट पोलीस ट्रेनिंग सेंटर'मध्ये पाठवले जाईल. दहशतवाद्यांच्या वाढत्या कारवायांचा मुकाबला करण्यासाठी आणि लक्ष्यित कारवाया करून दहशतवादी नेटवर्क नष्ट करणे, हे या पथकाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

# भारताने कडक नियम लागू केले नेपाळने चहा उत्पादन थांबवले

■ काठमांडू



**भारताने** नेपाळी चहाच्या आयातीवर कठोर गुणवत्ता मानके लागू केल्यानंतर नेपाळी चहा उत्पादकांनी अनिश्चित काळासाठी उत्पादन थांबवण्याची घोषणा केली आहे. भारत हा नेपाळी चहाचा सर्वात मोठा खरेदीदार देश असल्याने या निर्णयामुळे नेपाळच्या चहा उद्योगाचे कंबरडे मोडले आहे.

गेल्या आठवड्यात 'टी बोर्ड ऑफ इंडिया'ने स्पष्ट केले होते की, भारतात आयात होणारा चहा भारतीय मानकांनुसार योग्य आहे की नाही, हे तपासण्यासाठी नियम कडक करण्यात आले आहेत. भारतातील ग्राहकांच्या आरोग्याची सुरक्षा आणि चहाची गुणवत्ता राखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. हा नियम केवळ भारतातील घरगुती वापरासाठी येणाऱ्या चहावरच नाही, तर चहाच्या मिश्रणासाठी आणि पुन्हा निर्यात करण्यासाठी येणाऱ्या चहावरही लागू असेल. त्यामुळे आता भारतात येणारा चहा केवळ 'सुपर क्वालिटी'चाच असावा लागेल. भारताच्या या कडक भूमिकेनंतर नेपाळमधील चहा उत्पादक, विशेषतः कोशी प्रांतातील इलाम जिल्ह्यातील उत्पादक हवालदील झाले आहेत.

# यूएईत १५ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी

■ अबू धाबी

**संयुक्त** अरब अमिरातीत (यूएई) १५ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात आली आहे. मुलांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेणारा यूएई पहिला अरब देश ठरला आहे.



या निर्णयामुळे यूएईतील १५ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वैयक्तिक खाती उघडण्यास, वापरण्यास किंवा ऑपरेट करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. सोशल मीडिया कंपन्यांसाठी एआय आधारित सक्तीची वय पडताळणी प्रणाली लागू करण्यात आली, ज्यामुळे केवळ चुकीची जन्मतारीख टाकून खाते उघडता येणार नाही. १५ आणि १६ वयोगटातील मुलांना सोशल मीडिया वापरण्याची परवानगी आहे, परंतु त्यांच्यासाठी सुरक्षितता नियंत्रणे आणि वयाच्या योग्यतेनुसार सामग्री लागू असतील. सोशल मीडिया कंपन्यांना नवीन नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि १५ वर्षांखालील मुलांची खाती शोधून ती बंद करण्यासाठी १२ महिन्यांचा काळ देण्यात आला आहे.

# बडोद्यातील एसएसजी रुग्णालयात नमाज पठण केल्याने नवा वाद

■ वडोदा



**बडोदा** येथील सर सयाजीराव जनरल (एसएसजी) रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात ३ जणांना नमाज पठण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नवा वाद सुरू झाला आहे. या घटनेवर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालय प्रशासनाकडे चौकशी करुन कारवाईची मागणी केली. मग या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन आता रुग्णालय प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले. या रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. रंजन अय्यर यांनी सांगितले की, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी ही बाब निदर्शनास दिली. या घटनेचा व्हिडिओ सध्या व्हायरल झाला. आम्ही सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली. ही घटना सोमवारी संध्याकाळी इमारतीच्या तळमजल्यावर घडली. व्हिडिओमध्ये दिसणारे लोक एका रुग्णाचे नातेवाईक होते. ते शांततेत नमाज पठण करत होते. या प्रकारामुळे रुग्णालयाच्या कामकाजात कोणतीही बाधा आली नाही किंवा इतर रुग्ण आणि नातेवाईकांना कोणताही त्रास झाला नाही. सध्या आम्ही या घटनेशी संबंधित तथ्यांची पडताळणी करत आहोत.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या (एमएसयू) कॅम्पसमध्ये नमाज पठण केल्या जात असल्याच्या व्हिडिओनंतर ही घडामोड समोर आली आहे. या व्हिडिओमुळे धार्मिक कार्यांसाठी सार्वजनिक संस्थांच्या वापराबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# लेबनॉनवर इस्त्रायली हल्ले सुरूच
## अमेरिका-इराणमधील चर्चा स्थगित

■ वॉशिंग्टन

**अमेरिका** आणि इराण यांच्यात फ्रान्समध्ये काल शांतता करारावर स्वाक्षऱ्या झाल्यानंतर आज स्वित्झर्लंडमध्ये पुढील चर्चा होणार होती. परंतु ही बैठक अचानक स्थगित करण्यात आली. कारण शांतता करार असूनही इस्त्रायलने लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवले आहेत. आज इस्त्रायली हल्ल्यांमध्ये १८ लोकांचा मृत्यू झाला. दुसरीकडे, हिजबुल्लाहच्या हल्ल्यांमध्ये एका रणगाडा बटालियन कमांडरसह ४ इस्त्रायली सैनिक ठार झाले आहेत.

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध संपवण्यासाठी अंतरिम करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी रात्री फ्रान्समधील व्हर्साय पॅलेसमध्ये यासंबंधीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविराम करारावर स्वाक्षऱ्या झाल्यानंतर, दोन्ही देशांमधील पहिली औपचारिक चर्चा आज स्वित्झर्लंडमधील बर्गेनस्टॉक रिसॉर्टमध्ये आयोजित केली होती. मात्र ती बैठक स्थगित करण्यात आली आहे.

# पाणीटंचाईमुळे आमदार निवासात कागदी प्लेट! वडेट्टीवारांचा दावा

**मुंबई** - महाराष्ट्रात सध्या पाणीटंचाईचे भीषण संकट बिकट होत चालले असून, यावरून विरोधकांनी सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावरून गेल्या अनेक दिवसांपासून आमदार निवासात पाण्याची तीव्र टंचामुळे कागदी डिशचा वापर होत असल्याचा दावा केला आहे. वडेट्टीवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये भांडी धुण्यासाठीही पाणी शिल्लक नसल्याने, लोकप्रतिनिधींना चक्क कागदी प्लेट्समध्ये जेवण वाढण्याची वेळ आली आहे. ज्या सरकारला स्वतःच्या आमदारांच्या निवासातील पाण्याचे साधे नियोजन करता येत नाही, ते संपूर्ण महाराष्ट्राचा पाण्याचा एवढा मोठा प्रश्न कसा काय सोडवणार?

**Industrial And Prudential Investment Company Limited**
Paharpur House,8/1/B Diamond Harbour Road, Kolkata -700027

**NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE(S)**

Notice is hereby given that the certificate(s) of Industrial And Prudential Investment Company Limited for the under mentioned securities are stated to have been lost or misplaced and the registered holders have applied to the company for issue of duplicate Share certificate(s). Any person who has /have a claim(s) in respect of the said security(ies) should lodge such claim(s) in writing with R & T Agents of company viz. MUFG Intime India Private Limited (Formerly Linkintime India Private Limited), C- 101, 247 Park, Compound, L.B.S. Marg, Vikhroli West, Mumbai – 400083 within 15 days of publication of this notice after which no claim will be entertained and the Company shall proceed to issue Duplicate Share Certificate/s.

| Sr. No. | Name of the Shareholder | Registered Folio. No. | Certificate No. | Distinctive No's | | No. of Shares |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Gangadhar Pandurang Salaskar | G00092 | 323<br>1315 | 48280<br>608313 | 48629<br>609012 | 350<br>700 |

(AUTHORISED SIGNATORY)
sd/-
Place : Mumbai
Date : 20.06.2026
Industrial And Prudential Investment Company Limited

Rameshwar Media

# आता फक्त दाऊद इब्राहिम भाजपात यायचा बाकी आहे
## आपच्या संजय सिंह यांचा घणाघात

■ नवी दिल्ली

**पश्चिम बंगालमध्ये** भाजपाने केलेल्या फोडाफोडीच्या राजकारणावर आम आदमी पार्टीचे नेते खासदार संजय सिंह यांनी जळजळीत भाष्य केले. आता फक्त अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमने तेवढा भाजपात प्रवेश करणे बाकी आहे, अशी घणाघाती टीका सिंह यांनी केली. ते म्हणाले की, ममता बॅनर्जी विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्या आहेत. आता त्यांचा तृणमूल काँग्रेस पक्षही भाजपाने फोडला आहे. भाजपाच्या वळचणीला जाऊन बसलेल्या तृणमूलच्या नेत्यांमध्ये काही मुसलमान नेतेही आहेत. त्यांना लाज वाटली पाहिजे. भाजपा मुसलमानांचा द्वेष करते. त्यांचे मॉब लिंचिंग करते, त्यांच्या घरांवर बुलडोझर चालवते.

# कुत्रा आडवा आल्याने वृद्धेचा दुचाकीवरून पडून मृत्यू

**बेळगाव** - कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वाराने जोरात ब्रेक दाबल्याने मागे बसलेल्या ७५ वर्षीय वृद्धेचा रस्त्यावर पडून मृत्यू झाला. काल सायंकाळी बेळगाव तालुक्यातील बेळगाव-बागलकोट मार्गावर सांबऱ्याजवळ हा अपघात झाला. या अपघातातील मृत महिलेचे नाव शांतव्वा बसप्पा कलमठ असे आहे. त्या आपल्या मुलासोबत नातेवाईकांच्या घरी जाऊन दुचाकीवरून बेळगावकडे परतत होत्या. काल सायंकाळी पाचच्या सुमारास सांबरा गावाजवळ अचानक कुत्रा रस्त्यावर आल्याने मुलाने जोरात ब्रेक दाबला.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

**ई-निविदा सुचना**
**मलनिःस्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/SEWERAGE /६१/२०२६-२७ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''अ'' ''ब'' ''क'' आणि ''ड'' मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरीता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्त्वावर पंपाचा पुरवठा करून परिचलन करणे. | ५,४६,१७,२७७/- | २,४७,०००/- | २,३६०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा. क्र. पमपा/मल.वि./३६२६/प्र.क्र.०१,०२, ०३, ०४/५५८/२०२६
दिनांकः १९/०६/२०२६

सही/-
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

जा. क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.१६९/१८१/२०२६
दिनांकः १९/०६/२०२६

**कल्याण डोंबिवली महानगर पालिका, कल्याण**
**अभिव्यक्ती स्वारस्य निवेदन सूचना क्र. ०२/२६-२७**

भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण करणे, रेबिज रोगाचे लसीकरण करणे व जंतूनाशक औषध देणेकरिता भारतीय जीव जंतु कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थांकडून सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच आर्थिक वर्षाकरिता नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन मागविण्यात येत आहे.

| क्र. | तपशील | कोरे फॉर्म फी रुपये + जीएसटी १८% | अनामत रक्कम रुपये | कोरे फॉर्म विक्रीचा तारीख | अभिव्यक्ती स्वारस्य स्वीकृतीचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये महानगर मालकीचे कल्याण येथील कार्यरत निर्बिजीकरण केंद्रामध्ये मक्तेदाराने भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण करणे, रेबिज रोगाचे लसीकरण करणे व जंतुनाशक औषध देणेकरिता भारतीय जीव जंतु कल्याण मंडळ यांची मान्यता प्राप्त संस्थांकडून सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच आर्थिक वर्षाकरिता नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन मागविण्यात येत आहे. | २८,५००/- + ५,१६०/- = ३३,६३० | रु. १४,८५,०००/- | दि.१९/०६/२०२६ ते दि.२९/०६/२०२६ | दि.२९/०६/२०२६ सायं. ५.०० वाजेपर्यंत. |

१. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्म Website https://kdmc.gov.in/ या वर उपलब्ध आहे.
२. उक्त अभिव्यक्ती स्वारस्य शक्य झाल्यास दि.३०/०६/२०२६ रोजी दु. ३.०० नंतर उघडण्यात येतील.
३. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्मची विक्री पोस्टद्वारे करण्यात येणार नाही.
४. अभिव्यक्ती स्वारस्य फॉर्म स्वीकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय, क. डों. म. पा., कल्याण यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.
५. अभिव्यक्ती स्वारस्य Website https://kdmc.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
६. प्रि-बीड मीटिंग दि. २४/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त, क. डों.म.पा., कल्याण यांचे दालनात आयोजित करण्यात येईल.

कडोंमपा/जसंवि/मुका/२१०
दिनांक :- १९/०६/२०२६

सही/-
प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**जाहीर सूचना**
(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)
**कॉर्पोरेट ऋणको मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वैयक्तिक जामीनदार सौ. सारंगा ए. अगरवाल यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | |
|---|---|
| वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | सौ. सारंगा ए. अगरवाल |
| पीजीच्या निवासाचा पत्ता | ६०१, खटाव कॉन्डोमिनियम, जेएम मेहता रोड, मलबार हिल, मुंबई - ४००००६. तसेच येथेहीः ए. ए. इस्टेट्स प्रा. लि., आरएनए कॉर्पोरेट पार्क, कलानगर, जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१. |
| निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ - १ यांनी सीपी (आयबी)४५२ वर्ष २०२२ दिनांक १८.०६.२०२६ नुसार मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वैयक्तिक जामीनदार सौ. सारंगा ए. अगरवाल यांच्याविरुद्ध दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. |
| आयबीसी, २०१६ अंतर्गत पीजीच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक | दि. १८.०६.२०२६ |
| ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | अजित कुमार IBBI/IPA-003/IP-N00062/2017-2018/10548 |
| मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | ओकस क्वांटम, तिसरा मजला, कार्यालय ३०५, सेक्टर - ५१, गुरुग्राम, हरियाणा - १२२००३ ईमेल : cmaajitjha@gmail.com |
| ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | ओकस क्वांटम, तिसरा मजला, कार्यालय ३०५, सेक्टर - ५१, गुरुग्राम, हरियाणा - १२२००३ ईमेल : pg.aaestates@gmail.com |
| दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०७.२०२६ |
| संबंधित अर्ज येथे उपलब्धः | (अ) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट धनकोच्या वैयक्तिक जामीनदाराकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये अर्ज ब (ब) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट धनकोच्या वैयक्तिक जामीनदाराकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये अर्ज ब (ब) वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-१ यांनी दिनांक १८.०६.२०२६ नुसार, सौ. सारंगा ए. अगरवाल यांच्याविरुद्ध वैयक्तिक दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

सौ. सारंगा ए. अगरवाल (मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १०.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ०७ विरुद्ध उल्लेखित पत्त्यावर सादर करावे.

सौ. सारंगा ए. अगरवाल यांच्या धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह एकतर इलेक्ट्रॉनिक संपर्काद्वारे किंवा ते कुरियर, स्पीड पोस्ट, किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवून सादर करावे.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
अजित कुमार
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-003/IP-N00062/2017-2018/10548
दिनांकः १९.०६.२०२६
ठिकाणः गुरुग्राम

फॉर्म जी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण
**मे. मन इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड**
व्यावसायिक किंवा निवासी इमारतींच्या बांधकामासंबंधी तसेच वसाहत विकास सेवा.
(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए (१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशिल | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन / सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | मन इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड सीआयएनः U70101MH2006PLC164930 |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | १०२, मॅन हाऊस, दुसरा मजला, पवन हंस समोर, एस.व्ही. रोड, विले पार्ले - पश्चिम, मुंबई - ४०००५६. |
| ३. | वेबसाइटची युआरएल | कॉर्पोरेट कर्जदाराची कोणतीही सक्रिय वेबसाइट नाही. |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | कॉर्पोरेट कर्जदाराची प्रमुख मालमत्ता मुंबई येथे आहे. |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कॉर्पोरेट कर्जदार हा रिअल इस्टेट व्यवसायात कार्यरत असून, त्याच्या मालकीच्या मालमत्ता मुंबई येथे स्थित आहेत. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | नवीनतम लेखापरीक्षित वित्तीय अहवालानुसार, वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये कार्यचलनातून प्राप्त महसूल शून्य होते. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | दिवाळखोरी सुरू होण्याच्या तारखेला, कोणतेही कर्मचारी किंवा कामगार नव्हते. |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | खालील ईमेलवर संपर्क साधून माहिती मिळवता येईल: ई-मेलः ip.maninfraprojects@gmail.com |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता येथे युआरएल वर उपलब्ध आहेत: | खालील ईमेलवर संपर्क साधून माहिती मिळवता येईल: ई-मेलः ip.maninfraprojects@gmail.com |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | ०६ जुलै २०२६ |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | १३ जुलै २०२६ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | १८ जुलै २०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | २१ जुलै २०२६ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | २४ जुलै २०२६ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | २४ ऑगस्ट २०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | ip.maninfraprojects@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | कॉर्पोरेट कर्जदार हा एमएसएमई नाही. |

सही/-
मनोजकुमार अग्रवाल
रिझोल्यूशन प्रोफेशनल
मन इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत)
नोंदणी क्र. IBBI/IPA-001/IP-PO0714/2017-2018/11222
एएफए क्र.: एए१/११२२२/०२/३००६२७/१०९१५५ वैधता ३०.०६.२०२७ पर्यंत
ठिकाणः मुंबई
दिनांकः २०.०६.२०२६

**जाहीर सूचना**
(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)
**कॉर्पोरेट ऋणको मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. गोकुळ ए. अगरवाल यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | |
|---|---|
| वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | श्री. गोकुळ ए. अगरवाल |
| पीजीच्या निवासाचा पत्ता | ६०१, खटाव कॉन्डोमिनियम, जेएम मेहता रोड, मलबार हिल, मुंबई - ४००००६. तसेच येथेहीः ए. ए. इस्टेट्स प्रा. लि., आरएनए कॉर्पोरेट पार्क, कलानगर, जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१. |
| निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ - १ यांनी सीपी (आयबी)४५३ वर्ष २०२२ दिनांक १८.०६.२०२६ नुसार मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. गोकुळ ए. अगरवाल यांच्याविरुद्ध दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. |
| आयबीसी, २०१६ अंतर्गत पीजीच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक | दि. १८.०६.२०२६ |
| ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | अजित कुमार IBBI/IPA-003/IP-N00062/2017-2018/10548 |
| मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | ओकस क्वांटम, तिसरा मजला, कार्यालय ३०५, सेक्टर - ५१, गुरुग्राम, हरियाणा - १२२००३ ईमेल : cmaajitjha@gmail.com |
| ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | ओकस क्वांटम, तिसरा मजला, कार्यालय ३०५, सेक्टर - ५१, गुरुग्राम, हरियाणा - १२२००३ ईमेल : pg.aaestates@gmail.com |
| दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०७.२०२६ |
| संबंधित अर्ज येथे उपलब्धः | (अ) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट धनकोच्या वैयक्तिक जामीनदाराकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये अर्ज ब (ब) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट धनकोच्या वैयक्तिक जामीनदाराकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये अर्ज ब (ब) वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-१ यांनी दिनांक १८.०६.२०२६ नुसार, श्री. गोकुळ ए. अगरवाल यांच्याविरुद्ध वैयक्तिक दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

श्री. गोकुळ ए. अगरवाल (मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १०.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ०७ विरुद्ध उल्लेखित पत्त्यावर सादर करावे.

श्री. गोकुळ ए. अगरवाल यांच्या धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह एकतर इलेक्ट्रॉनिक संपर्काद्वारे किंवा ते कुरियर, स्पीड पोस्ट, किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवून सादर करावे.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
अजित कुमार
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-003/IP-N00062/2017-2018/10548
दिनांकः १९.०६.२०२६
ठिकाणः गुरुग्राम

**जाहीर सूचना**
(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)
**कॉर्पोरेट ऋणको मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. अनुभव ए. अगरवाल यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | |
|---|---|
| वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | श्री. अनुभव ए. अगरवाल |
| पीजीच्या निवासाचा पत्ता | ६०१, खटाव कॉन्डोमिनियम, जेएम मेहता रोड, मलबार हिल, मुंबई - ४००००६. तसेच येथेहीः ए. ए. इस्टेट्स प्रा. लि., आरएनए कॉर्पोरेट पार्क, कलानगर, जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१. |
| निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ - १ यांनी सीपी (आयबी)४१३ वर्ष २०२२ दिनांक १८.०६.२०२६ नुसार मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. अनुभव ए. अगरवाल यांच्याविरुद्ध दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. |
| आयबीसी, २०१६ अंतर्गत पीजीच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक | दि. १८.०६.२०२६ |
| ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | अजित कुमार IBBI/IPA-003/IP-N00062/2017-2018/10548 |
| मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | ओकस क्वांटम, तिसरा मजला, कार्यालय ३०५, सेक्टर - ५१, गुरुग्राम, हरियाणा - १२२००३ ईमेल : cmaajitjha@gmail.com |
| ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | ओकस क्वांटम, तिसरा मजला, कार्यालय ३०५, सेक्टर - ५१, गुरुग्राम, हरियाणा - १२२००३ ईमेल : pg.aaestates@gmail.com |
| दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०७.२०२६ |
| संबंधित अर्ज येथे उपलब्धः | (अ) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट धनकोच्या वैयक्तिक जामीनदाराकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये अर्ज ब (ब) भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट धनकोच्या वैयक्तिक जामीनदाराकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये अर्ज ब (ब) वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-१ यांनी दिनांक १८.०६.२०२६ नुसार, श्री. अनुभव ए. अगरवाल यांच्याविरुद्ध वैयक्तिक दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

श्री. अनुभव ए. अगरवाल (मे. ए. ए. इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १०.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ०७ विरुद्ध उल्लेखित पत्त्यावर सादर करावे.

श्री. अनुभव ए. अगरवाल यांच्या धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह एकतर इलेक्ट्रॉनिक संपर्काद्वारे किंवा ते कुरियर, स्पीड पोस्ट, किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवून सादर करावे.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
अजित कुमार
ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-003/IP-N00062/2017-2018/10548
दिनांकः १९.०६.२०२६
ठिकाणः गुरुग्राम

नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## ‘बाहुबली’च्या शिरपेचात मानाचा तुरा



**भारतीय** चित्रपटसृष्टीतील सर्वात भव्य आणि यशस्वी फ्रँचायझी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ‘बाहुबली’च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या फ्रँचायझीचा बहुप्रतीक्षित ॲनिमेटेड चित्रपट ‘बाहुबली: द इटरनल वॉर’ याची फ्रान्समधील आंतरराष्ट्रीय ॲनेसी ॲनिमेशन फिल्म फेस्टिव्हलमधील ‘वर्क इन प्रोग्रेस’ या अत्यंत महत्त्वाच्या विभागासाठी निवड झाली आहे. या प्रतिष्ठित व्यासपीठावर स्थान मिळवणारा हा अत्यंत मोजक्या भारतीय ॲनिमेटेड चित्रपटांपैकी एक ठरला आहे.

या जागतिक यशासोबतच या चित्रपटाने एक नवा विक्रमही प्रस्थापित केला आहे. या महोत्सवातील ‘बाहुबली: द इटरनल वॉर’च्या विशेष पॅनेल चर्चेसाठीची तिकीट विक्री सुरू होताच अवघ्या दोन मिनिटांच्या आत सर्व तिकिटे विकली गेली. यापूर्वी ‘स्पायडर-मॅन: इनटू द स्पायडर-व्हर्स’ आणि २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपटाचा ऑस्कर पुरस्कार जिंकणारा ‘फ्लो’यांसारख्या जागतिक चित्रपटांचे सादरीकरण याच ‘वर्क इन प्रोग्रेस’ विभागात करण्यात आले होते. ॲनेसी शहरात जूनच्या शेवटच्या आठवड्यात हा जागतिक ॲनिमेशन महोत्सव पार पडणार आहे.

## राजकुमारला अपेक्षा ‘उज्ज्वल’ यशाची



**राज्यसभेचे** खासदार आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या आयुष्यावर आधारित ‘प्रहार - द उज्ज्वल निकम स्टोरी’ या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अभिनेता राजकुमार राव मुख्य भूमिकेत असलेला हा चित्रपट येत्या ७ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘कॉकटेल २’ या चित्रपटासोबत या आगामी चित्रपटाचा उत्कंठावर्धक टीझर जोडण्यात आला असून, त्याला केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने यू/ए १६+ प्रमाणपत्र दिले आहे.

१ मिनिट आणि ५७ सेकंदांचा हा टीझर अत्यंत प्रभावी आणि गंभीर स्वरूपाचा आहे. उज्ज्वल निकम यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक हाय-प्रोफाईल खटले लढवले असले, तरी या चित्रपटात मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य आरोपी अजमल कसाब याच्या ऐतिहासिक खटल्यावर प्रामुख्याने प्रकाश टाकण्यात आला आहे.

राजकुमार राव याने नेहमीप्रमाणेच आपल्या अभिनयाची एक वेगळी छाप पाडली असून, उज्ज्वल निकम यांच्या भूमिकेसाठी त्याने घेतलेली मेहनत आणि त्याचे मराठी भाषेवरील प्रभूत्व टीझरमध्ये प्रकर्षाने जाणवते. या भूमिकेतील त्याचा अभिनय आणि दमदार संवाद प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारे आहेत. चित्रपटातील जबरदस्त संवाद आणि राजकुमारचा तीव्र अभिनय यामुळे चित्रपटगृहात प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आला ‘इथा’चा टीझर!

**अभिनेत्री** श्रद्धा कपूर हिच्या आगामी ‘इथा’ या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ‘कॉकटेल २’ या चित्रपटासोबत हा टीझर जोडण्यात आला आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने (सीबीएफसी) या २ मिनिटे १८ सेकंदांच्या टीझरला ‘यू/ए १३+’ प्रमाणपत्र दिले आहे.

या चित्रपटात श्रद्धा कपूर तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांची भूमिका साकारत आहे. टीझरची सुरुवात एका मोठ्या गर्दीने होते, जी इथाच्या नृत्याची मागणी करत असते. सामान्यतः अशा चित्रपटांमध्ये नायिकेची ग्लॅमरस किंवा भव्य एंट्री दाखवली जाते, मात्र यामध्ये श्रद्धा अत्यंत वेगळ्या आणि अनपेक्षित रूपात पडद्यावर अवतरते. विठाबाईंच्या भूमिकेसाठी तिने घेतलेली मेहनत, तिचे नृत्य आणि चेहऱ्यावरील हावभाव टीझरमध्ये विशेष लक्ष वेधून घेतात. ही भूमिका तिच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीतील सर्वात वेगळी आणि आव्हानात्मक ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.‘छावा’ चित्रपटाचे यशस्वी दिग्दर्शन करणारे लक्ष्मण उतेकर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.

या चित्रपटात रणदीप हुड्डा आणि मोहम्मद जीशान अयुब यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. येत्या २८ ऑगस्ट २०२६ रोजी रक्षाबंधनाचे औचित्य साधून देशभरातील चित्रपटगृहात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.



## करीना आणि पृथ्वीराजचा ‘दायरा’



**करीना** कपूर खान आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन यांच्या मुख्य भूमिका असलेल्या ‘दायरा’ या आगामी चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. हा बहुप्रतीक्षित चित्रपट येत्या १८ सप्टेंबर २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने हे दोन दिग्गज कलाकार पहिल्यांदाच रुपेरी पडद्यावर एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत.

या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुभव सिन्हा यांनी केले आहे. ‘मुल्क’, ‘आर्टिकल १५’ आणि ‘थप्पड’ यांसारख्या सामाजिक विषयांवर आधारित आणि विचार करायला लावणाऱ्या चित्रपटांसाठी अनुभव सिन्हा ओळखले जातात. त्यामुळे ‘दायरा’ हा चित्रपट देखील एका संवेदनशील आणि गंभीर विषयावर भाष्य करणारा थरारक ड्रामा असणार असल्याचे संकेत मिळत आहेत. सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात गणेशोत्सवाच्या सांगतेनंतर हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येईल.

## टॉम हॉलंड पुन्हा स्पायडरमॅनच्या भूमिकेत



**हॉलिवूडमधील** अत्यंत लोकप्रिय आणि बहुप्रतीक्षित चित्रपट ‘स्पायडर-मॅन: ब्रँड न्यू डे’ याचा दुसरा अधिकृत ट्रेलर प्रदर्शित झाला असून, या ट्रेलरने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. अभिनेता टॉम हॉलंड पुन्हा एकदा पीटर पार्कर म्हणजेच स्पायडर-मॅनच्या भूमिकेत परतत असून, हा चित्रपट येत्या ३० जुलै २०२६ रोजी भारतातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ‘स्पायडर-मॅन: नो वे होम’ (२०२१) मधील घडामोडींनंतर चार वर्षांनी या चित्रपटाची कथा पुढे सरकते. जादूमुळे पीटर पार्करची खरी ओळख संपूर्ण जग विसरले असून, तो आता न्यूयॉर्क शहरात अत्यंत एकटा आणि संघर्षमय आयुष्य जगत आहे. या नव्या ट्रेलरमध्ये पीटर पार्करच्या वाढत्या मानसिक तणावावर आणि त्याच्या कोळ्याच्या शक्तींमध्ये अचानक होणाऱ्या धोकादायक बदलांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. चित्रपटात त्याच्या शरीरातून थेट सेंद्रिय कोळी-जाळे (ऑरगॅनिक वेब-शूटर्स) बाहेर पडताना दिसत असून, या शक्तींवर नियंत्रण मिळवण्यासाठी तो धडपडत आहे.

## दरवेळी साथीदार बदलून तब्बल १२ घरफोड्या करणारा अटकेत

■ सोलापूर

**दिवसा** परिसरातील बंद घरे हेरून रात्री घरफोडी करणाऱ्या एका सराईत चोरट्याला फौजदार चावडी पोलिसांनी अटक केली. त्याच्याविरुद्ध यापूर्वी १२ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे, बहुतांश गुन्ह्यांमध्ये त्याने वेगवेगळ्या साथीदारांची मदत घेतली होती. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या किंवा संरक्षक भिंत नसलेल्या बंद घरातच तो चोरी करायचा.

संतोष कांबळे असे या चोरट्याचे नाव असून, सोलापूर शहरातील बुधवार पेठेत राहतो. पूना नाका परिसरातील नाकोडा रेसिडेन्सी फेज-२ येथील कापड व्यावसायिक भरत कमलकिशोर काबरा यांचे चुलत बंधू धीरज मुरलीधर काबरा यांच्या घरात झालेल्या चोरीच्या गुन्ह्यात त्याला गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे.

पोलीस चौकशीत त्याने चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीतील मुद्देमाल आणि दोन दुचाकी वाहने असा एकूण सात लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. धीरज काबरा यांच्या घरात सुमारे दहा तोळे सोन्याचे दागिने होते. चोरी करताना संतोष कांबळेच्या हाती चार ते पाच तोळे वजनाचे दागिने लागले. ते दागिने अधिक चमकत असल्याने त्याला ते बनावट असल्याचा संशय आला.

## शिंपोली गावदेवी मैदान वाचवण्यासाठी उद्या आंदोलन

■ मुंबई

बोरिवली पश्चिम येथील शिंपोली गावदेवी क्रीडा मैदानाचे आरक्षण बदलून त्या जागेवर खासगी शाळा उभारण्याच्या निर्णयाविरोधात स्थानिक नागरिक आक्रमक झाले आहेत. या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवत मैदान वाचवण्यासाठी नागरिक एकवटले आहेत. ‘शिंपोली गावदेवी मैदान बचाव कृती समिती’च्या वतीने २१ जून रोजी सकाळी १० वाजता मैदान परिसरात आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘मैदान ही केवळ मोकळी जागा नसून मुलांच्या बालपणाची आणि त्यांच्या स्वप्नांची जागा आहे,’ असे म्हणत नागरिकांनी या निर्णयाचा निषेध केला आहे. मैदान वाचेल तरच बालपण वाचेल, असा नारा देत नागरिकांना या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## १ ऑक्टोबरपासून पवई तलावात जाणारे सांडपाणी बंद करणार

■ मुंबई

**मुंबई** पालिकेने जाहीर केले आहे की, १ ऑक्टोबरपासून पवई तलावात जाणारे सर्व सांडपाण्याचे प्रवाह पूर्णपणे बंद केले जातील. या निर्णयामुळे दररोज तलावात मिसळणारे सुमारे १८ दशलक्ष लीटर प्रक्रिया न केलेले सांडपाणी रोखले जाऊन तलावाचे पाणी स्वच्छ होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच पवई तलाव व परिसराच्या पुनर्विकासासाठी ‘एईकॉम एशिया कंपनी लिमिटेड’ या सल्लागार संस्थेची नियुक्ती केली असून, त्यासाठी पालिका १ कोटी ८५ लाख रुपये मोजणार आहे.

यासंदर्भात पालिका अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले की, तलावात जाणारे १८ पैकी सर्व १८ सांडपाण्याचे स्त्रोत मलनिःसारण वाहिन्यांच्या माध्यमातून वळवले जात आहेत.यातील काही पाणी मलजल प्रक्रिया केंद्रात शुद्ध करून पुन्हा तलावात सोडले जाईल, तर उरलेले आदि शंकराचार्य मार्गावरून भांडुप येथील केंद्राकडे वळवले जाईल. या सांडपाणी मुक्ती प्रकल्पासोबतच, आदि शंकराचार्य मार्ग परिसरातील तलावपट्ट्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी महापालिकेने ‘एईकॉम एशिया कंपनी लिमिटेड’ या सल्लागार कंपनीची देखील नेमणूक केली आहे. यापूर्वी तलावाच्या दूषित पाण्यामुळे जलचर आणि मगरींच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

### पुनर्विकासकामासाठी सल्लागार कंपनी नेमली

## ‘दलबदलूं’ना रोखण्याची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

■ नवी दिल्ली

**सध्या** घाऊक प्रमाणावर होत असलेली पक्षांतरे रोखण्यासाठी कठोर निर्देश देण्याची मागणी करणारी एक याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ही याचिका मोघम स्वरुपात आरोप करणारी असून त्यामध्ये ठोस असे काहीही नाही, असे निरीक्षण याचिका फेटाळताना न्यायालयाने नोंदविले. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल, महाराष्ट्रात शिवसेना उबाठा आणि उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पार्टीमध्ये फूट पडण्याच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड जया सुकीन यांनी युक्तिवाद केला. राजकीय नेत्यांना पक्ष बदलण्यासाठी पैशांचे आमिष दाखवले जात आहे. त्यांना धाक दाखवून पक्षत्याग करण्यास भाग पाडले जात आहे. याला आवर घालणे आवश्यक आहे, असे ॲड. सुकीन यांनी सांगितले.

## उबाठाच्या वरुण सरदेसाईंच्या जनता दरबारात आशिष शेलारांची उपस्थिती

■ मुंबई

**शिवसेनेच्या** ६० व्या वर्धापन दिनानिमित्त उबाठाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी वांद्रे पूर्व मतदारसंघात आयोजित केलेल्या विशेष एसआरए ‘जनता दरबारात’ भाजपा नेते आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी हजेरी लावल्याने राजकीय चर्चांना उधाण आले. या जनता दरबारात नागरिकांना बायोमेट्रिक अडचणी, पात्रतेचा वाद, सदनिकांचे हस्तांतरण, घरवाटप, प्रलंबित भाडे, वारसपत्र प्रक्रिया तसेच झोपडपट्टी पुनर्वसनाशी संबंधित विविध प्रश्नांवर नागरिकांनी थेट मांडणी केली. अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन व तत्काळ पाठपुराव्याची हमी देण्यात आली. यावेळी शेलार आणि सरदेसाई यांच्यात हस्तांदोलन आणि जुजबी बोलणे झाले.

यावेळी बोलताना शेलार म्हणाले की, मुंबई झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना या केवळ झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्यापुरत्याच मर्यादित नसून सामान्य नागरिकांचे ‘स्वप्नातील घर’ पूर्ण करण्याचे काम करतात. सरकार योजना तयार करते. मात्र अंमलबजावणीच्या प्रक्रियेत नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

## समान नागरी कायदा विधेयक पावसाळी अधिवेशनात मांडणार

■ भोपाळ

**मध्य** प्रदेश सरकार विधानसभेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात समान नागरी संहिता कायदा विधेयक आणणार असून, महाकाळाची इच्छा आहे की, या विधेयकाला पावसाळी अधिवेशनात सभागृहाची मंजुरी मिळावी, असे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितले. त्यांच्या वक्तव्यावरून हे स्पष्ट होते की, मध्य प्रदेश हे समान नागरी कायदा लागू करणारे तिसरे राज्य ठरणार आहे.उत्तराखंड आणि गुजरात सरकारने यापूर्वीच समान नागरी कायदा लागू केला आहे. मध्य प्रदेशचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होणार आहे.

### मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांची घोषणा



मानखुर्द परिसरातील नाल्यांची अद्यापही साफसफाई झाली नाही. या नाल्यांमध्ये अजूनही कचऱ्याचा ढीग साचलेला आहे. (छाया: दीपक साळवी.)

## मुख्यमंत्री विजय यांचा घोडेबाजार आरोप करणारी याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**तमिळनाडू** विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावेळी घोडेबाजार झाल्याचा आरोप करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली आहे. या आरोपांना दुजोरा देणारा कोणताही पुरावा नसल्याने त्याबाबत विचार करता येणार नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री विजय यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या याचिकेद्वारे विश्वासदर्शक ठरावाशी संबंधित कथित राजकीय गैरव्यवहाराची सीबीआयकडून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच प्रस्तावित चौकशी पूर्ण होईपर्यंत तमिळनाडूमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची विनंती देखील या याचिकेत करण्यात आली होती.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळत म्हटलं की, हे आरोप अस्पष्ट, निराधार आणि वरकरणी केलेले दिसत आहेत. त्या दाव्यांना पुष्टी देण्यासाठी कोणतीही विश्वसनीय सामग्री उपलब्ध असल्याचे दिसत नाही. त्यामुळे चौकशीचे आदेश देण्यासारखा कोणताही विश्वसनीय पुरावा न्यायालयासमोर सादर करण्यात आलेला नाही.

## अमेरिका-युरोपने नाकारलेला ‘ॲमेझॉन’ प्रकल्प ठाण्यात! आव्हाडांचा आरोप

■ ठाणे

**ठाणे** महापालिकेमध्ये सध्या गाजत असलेल्या टीडीआर घोटाळ्यावरून आधीच वनविभागासह पालिकेवर टीका होत असताना आता पालिकेच्या आणखी एका नव्या आणि वादग्रस्त निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे. अमेरिका आणि युरोपमधील काही देशांनी हद्दपार केलेला ‘ॲमेझॉन’चा मेगा डेटा सेंटर प्रकल्प आता ठाण्यात उभारण्याचा घाट घातला जात असल्याचा खळबळजनक आरोप शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. या नव्या मेगा डेटा सेंटर प्रकल्पामुळे ठाण्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. मात्र, जितेंद्र आव्हाड यांनी एका पत्रकार परिषदेत या दाव्यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. ते म्हणाले की, या महाकाय प्रकल्पामुळे प्रत्यक्षात केवळ ६० जणांनाच रोजगार मिळणार असून, त्याबदल्यात सुमारे ६०० ठाणेकरांच्या जीवावर आणि आरोग्यावर गंभीर धोका निर्माण होणार आहे.

## धनंजय औंढेकर महावितरणच्या संचालक (संचालन) पदी रूजू

■ मुंबई



मुंबई-महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) म्हणून धनंजय औंढेकर यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.

औंढेकर यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून ॲडव्हॉन्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. औंढेकर हे १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून माजलगाव (जि. बीड) येथे रूजू झाले. २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून त्यांची कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. त्यानंतर २०१६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून अधीक्षक अभियंता तर २०१९ मध्ये पदोन्नतीने मुख्य अभियंता पदी निवड झाली.

## नवी मुंबईत मनपा कंत्राटी कामगारांना ७,५०० रु. वेतनवाढ

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई महापालिकेतील सुमारे ८,५०० कंत्राटी चतुर्थ श्रेणी कामगारांना दरमहा ७,५०० रुपयांची वेतनवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सभागृह नेते सागर नाईक यांनी मांडलेल्या या प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

याबाबत माहिती देताना सागर नाईक म्हणाले की, या कंत्राटी कामगारांना २०१५ पासून वेतनवाढ मिळाली नव्हती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि मंत्री गणेश नाईक यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. नागरी सेवा संचालन विशेष भत्ता या स्वरूपात ही वेतनवाढ देण्यात येणार असून, यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेत सत्तेत आल्यानंतर अवघ्या पाच महिन्यांत हा निर्णय घेऊन कामगारांना न्याय देण्यात आला केले.

# अमित शहांसाठी खास सोय! भाविकांना अंबाबाईचे दर्शन बंद



**कोल्हापूर-** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या कोल्हापूर दौऱ्यावर येणार आहेत. ते अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी येणार असल्याने त्यांची खास सोय करीत मंदिर समितीने अंबाबाई मंदिरात उद्या सामान्य भाविकांसाठी सकाळी आठ ते दुपारी साडेबारा यावेळेत दर्शन बंद ठेवण्यात येणार आहे. अमित शहा उद्या कोल्हापूर दौऱ्यावर आहेत, यावेळी ते सकाळी मंदिरात भेट देऊन विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेणार आहेत. यामध्ये प्रदक्षिणामार्ग तसेच राम मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामांचा समावेश आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. अमित शहा यांची सभाही होणार आहे.

# माणूस आधी, सोय नंतर

आज माझ्या घरी साखर संपली होती.
विचार केला... बाहेर जायचं कशाला?
Blinkit वरूनच ऑर्डर टाकूया
मोबाईल उचलला, दोन क्लिक केले
आणि स्क्रीनवर आलं
१० मिनिटांत डिलिव्हरी
मनाला एकदम शांतता मिळाली.
मी माझ्या कामाला लागले.
पण हेच ते १० मिनिटं
आज आपणा सगळ्यांना याची सवय लागली.
एक बटण दाबायचं आणि समोरचा
माणूस नाही, जणू एखादी मशीनच काम
करते असं गृहित धरायचं वेळेत आलं
तर ठीक, आणि २-४ मिनिटं उशीर
झाला तर राग!, तक्रार =न्न, कधी ऑर्डर कॅन्सल.
आजही दारावर टकटक झाली
थोडा उशीरच झाला होता.
दार उघडलं, तर समोर एक मुलगा उभा.
वय फारसं नव्हतं,
पण चेहऱ्यावर जबाबदाऱ्यांच्या रेषा
होत्या. श्वास जोरात चालू होता,
हात किंचित थरथरत होते,
आणि डोळे जणू खूप काही सांगायचं
होतं. सामान घेतलं.
पण का कुणास ठाऊक, तोंडातून एवढंच
निघालं..
सगळं ठीक आहे ना?
तुम्ही खूप टेन्शनमध्ये दिसताय.
आणि तिथेच त्याचा संयम तुटला
डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले
ना आवाज, ना हुंदका
जणू वर्षानुवर्षं रडायलाच परवानगी
मिळाली नव्हती.
थोड्या वेळाने म्हणाला,
मॅडम आजपर्यंत कुणी हे विचारलंच
नव्हतं.
उशीर झाला की लोक फक्त रागावतात.
कधी सामान परत देतात,
कधी ऑर्डर कॅन्सल करतात.
तो थांबला. श्वास सावरला.
आणि अगदी हळू आवाजात म्हणाला -
माझी बायको हॉस्पिटलमध्ये आहे.
आज तिची डिलिव्हरी आहे
फोन येतोय - लवकर ये म्हणतात.
तो क्षण
जणू वेळच थांबला
माझ्यासमोर डिलिव्हरी बॉय नव्हता.
माझ्यासमोर एक नवरा उभा होता,
जो बाबा होणार होता
तो पुढे म्हणाला,
रस्त्यातच हॉस्पिटल लागतं.
एकदा पाहून येऊ म्हणालो
फक्त एक क्षण.
पण त्याच क्षणात उशीर झाला.
तो अपराधी वाटत होता.
जणू काही गुन्हाच केला आहे अशा
नजरेने.
पण खरं तर तो गुन्हेगार नव्हता
तो मजबूर होता.
एका बाजूला बायको वेदनांशी झुंज देत
होती, आणि दुसऱ्या बाजूला नोकरी -
ज्यामुळे घर चालतं.
ड्युटी सोडली असती तर
नोकरी जाण्याची भीती.
आणि उशीर झाला तर
लोकांचा राग
आज तो अडकला होता
कुटुंब आणि पोटाच्या मध्ये.
मी पूर्णपणे गप्प झाले.
डोळे भरून आले
मन खूप जड झालं.
आपण ज्या १० मिनिटांसाठी भांडतो,
आरडाओरडा करतो,
कधी कधी तेच १० मिनिटं



कोणाच्या आयुष्यातले
सगळ्यात मौल्यवान क्षण हिरावून घेतात.
आज एक गोष्ट उमगली
प्रत्येक उशीर म्हणजे बेपर्वाई नसते.
प्रत्येक माणूस लापरवाह नसतो.
काही लोक गप्पच
आपल्या आनंदाचा,
आपल्या अश्रूंचा,
आपल्या स्वप्नांचा बळी
इतरांच्या सोयीसाठी देत असतात
आपण खोलीत बसून सेकंद मोजतो,
आणि कुणीतरी रस्त्यावर
आपलं संपूर्ण आयुष्य सांभाळत धावत
असतो
एक छोटीशी विनंती
पुढच्या वेळी कुणी थोडा उशिरा आला
तर रागावण्याआधी
फक्त एकदा विचारा -
सगळं ठीक आहे ना?
कदाचित समोर उभा असलेला माणूस
कुणाचा नवरा असेल,
कुणाचा बाबा असेल,
कुणाचा मुलगा असेल
जो जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली
दबलेला
फक्त थोडीशी माणुसकी शोधत असेल व
कारण आपण ग्राहक आहोत
पण तोही माणूस आहे. माणूस आधी.
सोय नंतर.

# खासदारांनी पोस्ट, बॅनरवरून उद्धव ठाकरेंचा फोटो काढला

» पान १ वरून

चांगलीच चर्चेत राहिली. जाधव यांच्या पोस्टमध्ये पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे छायाचित्र गायब होते आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेली मशालही नव्हती. फक्त शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आणि त्याखाली ‘अखंड शिवसेना, अटळ हिंदुत्व... ६० वर्षे हिंदुत्वाशी वचनबद्धता’, असा संदेश देण्यात आला होता. याच संजय जाधव




यांना मंत्रिपदाचे आश्वासन दिल्याची चर्चा आहे. दुसरीकडे खासदारांच्या बंडखोरीमुळे संतप्त झालेल्या कडवट उबाठा कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी रस्त्यावर उतरून निषेध केला. सोलापूरमध्ये सहा फुटीर खासदारांचा जोरदार निषेध करीत रस्त्यावर उतरून जोरदार घोषणाबाजी केली. फुटीर खासदारांच्या ऑपरेशन टायगरला त्यांनी ऑपरेशन टॉमी असे नाव दिले. पळून गेलेले खासदार भाकरीच्या तुकड्यासाठी फितूर झाले,अशी टीका उबाठाचे पदाधिकारी महेश धाराशिवकर आणि प्रताप चव्हाण यांनी केली. गद्दारांशी कसे वागायचे याची शिकवण बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिलेली आहे. गद्दारी करणारे खासदार सोलापुरात दिसले तर त्यांना आमचा हिसका काय असतो हे दाखवून देऊ, असा इशाराही त्यांनी दिला. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिर परिसरातील गणपती घाट येथे मोठ्या संख्येने एकत्र येत बंडखोर खासदारांचे प्रतिकात्मक श्राद्ध घालत मोठमोठ्याने बोंबा मारल्या. भाऊसाहेब वाकचौरे स्वर्गात तरी सुखी राहा, तिकडे तरी गद्दारी करू नकोस, संजय जाधव तुला नरकातही जागा मिळणार नाही, ओमराजे निंबाळकर तुला ओमराजे कसे म्हणायचे रे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

मुंबईत उबाठाकडून मोठ्या प्रमाणावर पोस्टरबाजी करण्यात आली होती. या बॅनरमधून पक्षाने आपल्या विचारधारेचा आणि राजकीय वारशाचा पुनरुच्चार करत विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे. मुंबईतील विविध भागांत लावण्यात आलेल्या बॅनरवर ‘गद्दार बदलले, चेहरे बदलले, पण विचार नाही!’ असा मजकूर झळकत असून, राजकीय वर्तुळात या संदेशाचा संबंध २०२२ मधील आमदारांच्या बंडाशी तसेच अलीकडे सहा खासदारांनी घेतलेल्या भूमिकेशी जोडला जात आहे.

कालपासून नॉट रिचेबल असलेले धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी बंडखोरीनंतर आज पहिली प्रतिक्रिया देताना प्रत्येक बंडखोर जी कारणे देतो तीच न पटणारी कारणे दिली. पक्ष सोडण्याचा निर्णय भावनिकदृष्ट्या चुकीचा, पण राजकीयदृष्ट्या योग्य आहे. माझ्यासमोर राजकीय अस्तित्वाचे संकट उभे ठाकले होते. मी मोठ्या धर्मसंकटात सापडलो होतो. विकासनिधीचा अभाव यांसारखी कारणेही होती. पैशांसाठी मी बंडखोरी केली असे आरोप केले जात आहेत. ते पूर्णपणे चुकीचे आहेत, असे ओमराजे म्हणाले. त्याचवेळी त्यांनी आदित्य ठाकरे यांना सल्लाही दिला. उद्धव ठाकरे प्रकृतीच्या कारणामुळे राज्यात फारसे दौरे करू शकत नाहीत, हे मान्य आहे. पण आदित्य ठाकरे यांनी तरी राज्यात फिरले पाहिजे. आमदार-खासदारांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत, असे ओमराजे म्हणाले. दरम्यान, ओमराजे यांच्या बंडखोरीमुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. गेल्या चार दिवसांत सोशल मीडियावरील त्यांच्या फोलोअर्सची संख्या तब्बल पंधरा हजाराने घटली आहे.

या संकटाच्या प्रसंगी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत निष्ठेने ठामपणे उभे राहिलेले नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांचे आज नाशिक रेल्वे स्थानकांवर हजारो शिवसैनिकांच्या उपस्थितीत औक्षण करण्यात आले. त्यांच्यावर पुष्पवर्षाव करण्यात आला आणि अभूतपूर्व जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वाजे भावनिक झाले. अशा प्रकारचा अनुभव मी आयुष्यात पहिल्यांदाच घेत आहे. माझ्या कुटुंबाने माझ्यावर जे संस्कार केले, वडिलांनी जी शिकवण दिली त्याप्रमाणे मी वागलो, असे वाजे म्हणाले. त्यावेळी त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळत होते. उबाठाने आज वर्धापन दिनानिमित्त शिवसेना प्रत्येकासाठी या घोषवाक्याचा नवा टीझर प्रदर्शित केला. किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी, काळोखावर खोदीत बसला तेजाची लेणी, अशा ओळी आणि बाळासाहेब ठाकरेंचे शिवसैनिकांना अभिवादन करतानाचे पाठमोरे छायाचित्र, अशी पोस्ट उद्धव ठाकरे यांनी सोशल मीडियावर केली आहे.

दरम्यान शिवसेना शिंदे गटाच्या वर्धापनदिन सोहळ्यात गोरेगावच्या नेस्को एक्झिबिशन सेंटरच्या संपूर्ण परिसरात फक्त बाळासाहेबांचेच बॅनर दिसत होते. ‘जनात शिवसेना, मनात शिवसेना’ हे घोषवाक्य बॅनरवर होते. बाळासाहेबांच्या विचारांचा जागर करत शिंदे गटाने बाळासाहेबांच्या वारशावर आपला दावा सांगण्याचा प्रयत्न केला.

## उबाठाचे १४ आमदारही फुटणार? आमदार बांगर व शंभूराज यांचा दावा

उबाठातील सहा खासदारांच्या बंडामुळे राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाला असतानाच आता उबाठाचे २० पैकी १४ आमदारही शिंदे गटात लवकरच प्रवेश करतील, असा दावा शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांनी केला. शिंदे गटाचे मंत्री शंभूराज देसाई यांनीही याला दुजोरा दिला. ऑपरेशन टायगरच्या यशानंतर आता ऑपरेशन टायगर २.० ची चर्चा सुरू झाली आहे. संतोष बांगर यांच्या विधानामुळे उबाठातील अस्वस्थता आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संतोष बांगर म्हणाले की, सहा महिन्यांपूर्वीच मी सांगितले होते की, काही खासदार शिंदे गटात येतील. आज ते वास्तवात घडले आहे. शिंदे साहेबांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सहाही खासदार आमच्यासोबत आले आहेत. आम्हाला जशी बातमी कळली तसे आम्ही नागेश पाटील-आष्टीकर यांचे स्वागत हिंगोलीमध्ये केले आहे. नागेश पाटील-आष्टीकर यांच्या शिवसेनेमधील प्रवेशानंतर पक्षाला बळ मिळणार आहे. यामुळे शिवसेना वाढणार आहे. आगे आगे देखो होता है क्या. उबाठातील १४ आमदार आगामी काळात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करतील. कारण बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची शिवसेना म्हणजे एकनाथ शिंदे यांची शिवसेना आहे. शिंदे साहेब हिंदुत्वाच्या विचारांवर महाराष्ट्राला पुढे नेत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आणि जनतेतील प्रतिसादातही शिंदे गटाला पाठिंबा वाढत आहे. मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, उबाठाच्या खासदारांमध्ये खदखद आणि अस्वस्थता आहे. आम्ही सर्व खासदार-आमदार एकमेकांचे मित्र आहोत, त्यामुळे मंत्रालयात आणि सभागृहात आमच्या भेटीगाठी होत असतात. ही खदखद सहा खासदारांच्या कृतीतून समोर आली आहे. आमदारांची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. उलट उबाठाच्या आमदारांमध्ये अधिक अस्वस्थता आहे. कारण त्यांना नेतृत्वाकडून पुरेसे पाठबळ मिळत नाही. त्यामुळे खासदारांच्या बाबतीत जे घडले, त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## एका फुटीराला केंद्रात मंत्रिपद बाकीच्यांना २५-२५ कोटी रुपये

» पान १ वरून

किंवा फूट म्हणता येणार नाही. ही सौदेबाजी आहे. जे आमच्यातून बाहेर गेले त्यांच्याकडे कसलाही विचार नाही. ते राजकीय गोलपिठ्यावर उभे राहिले होते. त्यांची बोली लावून त्यांना विकत घेण्यात आले आहे, असे राऊत म्हणाले. याप्रसंगी या सर्व फुटीरनाट्याला पडद्याआडून मदत करणाऱ्या भाजपावर राऊत यांनी हल्लाबोल केला. बंड आणि क्रांती याची व्याख्या भारतीय जनता पक्षाला असण्याची सुतराम शक्यता नाही. कारण स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांचे काडीचेही योगदान नाही. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांचा एकही माणूस फासावर चढला नाही. केवळ पैसा आणि सौदेबाजी या एकमेव विचारावर हा पक्ष चालला आहे, असे राऊत म्हणाले.

# गुजरातच्या शेतकऱ्यांचा ३० जून रोजी रास्तारोको

**अहमदाबाद** - शेतीच्या सुपीक जमिनीतून वीजवाहक तारांसाठी विजेचे खांब टाकण्याच्या विरोधात गुजरातच्या शेतकरी संघटना आता अधिक आक्रमक झाल्या असून, या व अन्य प्रलंबित मागण्यांसाठी येत्या ३० जून रोजी राज्यव्यापी रास्तारोको आंदोलनाची हाक दिली आहे. काही दिवसांपूर्वी गांधीनगरमध्ये शेतकरी संघटनांनी मोर्चा काढला होता. त्यावेळीच नेत्यांनी स्पष्ट सांगितले होते की, जोपर्यंत सरकार आपल्या मागण्या मान्य करत नाही तोपर्यंत आंदोलने होतच राहतील. त्याच भूमिकेतून हे राज्यव्यापी रास्तारोको आंदोलन पुकारण्यात आले आहे. किसान काँग्रेसच्या नेत्यांनी सांगितले की, शेतजमिनीचा वापर विजेचे खांब टाकण्यासाठी करणार असाल तर त्याचा मोबादला शेतकऱ्यांना मिळालाच पाहिजे. जमीन अधिग्रहणासंबंधीच्या २०१३ च्या कायद्यातील तरतुदींनुसार नुकसानभरपाई मिळवणे हा शेतकऱ्यांचा हक्क आहे. तो मिळवण्यासाठी ३० जूनचे राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे.

# नीट फेरपरीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्याची आत्महत्या

■ अहमदाबाद

**अहमदाबादच्या** न्यू राणीप परिसरात नीट फेरपरीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थी काहन पटेल याने पहाटे राहत्या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. काहन हा न्यू राणीप येथील ॲरिस्टो आनंदम फ्लॅट्सच्या बी-ब्लॉकमध्ये राहत होता. पहाटे सुमारे २.३० वाजता त्याने आपल्या बेडरूमच्या बाल्कनीला लावलेली जाळी कापून सहाव्या मजल्यावरून उडी मारली. नीट परीक्षेने आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांचा बळी घेतला आहे.

इमारतीच्या सुरक्षा रक्षकाने सर्वप्रथम त्याला खाली पडलेले पाहिले आणि तातडीने रहिवासी तसेच आपत्कालीन सेवांना माहिती दिली. पडल्यानंतर काही वेळ तो जिवंत असल्याचे सांगितले गेले. मात्र वैद्यकीय मदत पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सिव्हिल रुग्णालयात पाठविण्यात आला.

# मृत्यूनंतरही चिमुकलीवर अत्याचार
## नसरापूर प्रकरणात सरकारी पक्षाचा दावा

■ पुणे

**नसरापूर** येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाची सुनावणी सध्या अंतिम टप्प्यात आली आहे. या प्रकरणात आरोपीने मृत्यूनंतरही चिमुकलीवर अत्याचार केल्याचा दावा सरकारी पक्षाने न्यायालयात केला आहे.

या प्रकरणात आतापर्यंत तब्बल ५५ साक्षीदारांच्या साक्षी न्यायालयात नोंदवण्यात आल्या असून, वैद्यकीय पुरावे, वैज्ञानिक माहिती, बाल साक्षीदाराची साक्ष आणि डीएनए प्रोफायलिंग यांचा समावेश आहे. सायबर तज्ज्ञ आणि मुख्य तपास अधिकाऱ्यांची साक्षही नुकतीच नोंदवण्यात आली आहे. दररोज सुनावणी सुरू असल्याने या खटल्याचा निकाल महिनाभरात लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणात सरकारी पक्षाने न्यायालयासमोर एक धक्कादायक दावा केला आहे. ससून रुग्णालयाच्या शवविच्छेदन अहवालाचा दाखला देत, आरोपी भीमराव कांबळे याने चिमुकलीच्या मृत्यूनंतरही मृतदेहावर अत्याचार केल्याचे वैद्यकीय पुरावे असल्याचा दावा सरकारी पक्षाने केला आहे. हे पुरावे न्यायालयासमोर मांडण्यात आले आहेत. आरोपी भीमराव कांबळे याच्यावर यापूर्वीही दोन वेळा लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये कारवाई झाल्याची माहितीही सरकारी पक्षाने न्यायालयात दिली आहे.

# राहुल गांधी ५६ वर्षांचे झाले
## केक कापून वाढदिवस साजरा

■ नवी दिल्ली

**काँग्रेसचे** नेते राहुल गांधी यांनी आज त्यांचा ५६ वा वाढदिवस साजरा केला. यानिमित्त ते बहीण प्रियंका गांधी यांच्यासह दिल्लीतील काँग्रेस मुख्यालय ‘इंदिरा भवन’ येथे पोहोचले. येथे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका गांधी, पक्षाचे नेते व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला. राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते शशी थरूर, एम. के स्टॅलीन, रेड्डी वेणुगोपाल, संजय राऊत यांनी शुभेच्छा दिल्या. दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयाबाहेर वाढदिवसाचे पोस्टर लावण्यात आले, तर वाराणसीमध्ये कार्यकर्त्यांनी त्यांच्या छायाचित्रावर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

दुग्धाभिषेक केला. खरगे म्हणाले की, राहुल गांधी हे संविधानाच्या मूल्यांप्रती समर्पित असून, त्यांनी नेहमीच दुर्लक्षित व वंचित घटकांचा



आवाज बुलंद केला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ‘विद्यार्थ्यांचा आवाज’ या नावाने देशव्यापी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. आज त्यांनी सांगितले की, प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षांमधील गैरव्यवहार, महागडे शिक्षण आणि बेरोजगारी यांसारखे मुद्दे सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी ही मोहीम व्यासपीठ ठरेल.

# गडकरींच्या नातवाची मुंज
## फडणवीस हजर! मोदींचे पत्र

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** मंत्री नितीन गडकरी यांचा नातू निनाद याच्या मुंज समारंभाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खास पत्र पाठवून गडकरींचे नातू निनाद याला शुभाशीर्वाद व शुभेच्छा दिल्या. राजकारण आणि उद्योगाचा वारसा गडकरी कुटुंबात ठेवायला आणखी एक पिढी सज्ज होत आहे आणि याला फडणवीसांचा आशीर्वाद आहे, अशी टीका सुरू झाली आहे.

पंतप्रधान मोदींनी गडकरींचा नातू निनाद याला खास पत्र पाठवून शुभाशीर्वाद दिले. या पत्रात मोदी म्हणतात की, व्रतबंध हा बालकाच्या जीवनात गुरू-शिष्याचे नाते निर्माण करून बालकाला जीवनातल्या यशस्वितेची मार्गक्रमणा दाखवतो. भारतीय परंपरेतील सोळा संस्कार यांमधील उपनयन संस्कार फार महत्त्वाचा मानला जातो. मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनात यशस्वी होण्यासाठी जे उत्तम संस्कार लागतात, त्याची सुरुवात या उपनयन संस्कार आणि गुरु शिष्य परंपरेतून होते. निनादला त्याच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी माझ्या भरभरून शुभेच्छा!! असे पंतप्रधान मोदींनी आपल्या खास पत्रात नमूद केले आहे.




**मद्यावरील आयात शुल्कात होणारी कपात ही प्रामुख्याने भारत-ब्रिटन व्यापार करारांचा भाग आहे. यामुळे प्रीमियम मद्यावरील शुल्क १५ टक्के वरून थेट २० टक्क्यांपर्यंत खाली येणार असले, तरी यातून भारतीय उद्योगांचे जागतिक एकत्रीकरण, उत्पादन आणि निर्यातीला मोठा फायदा होणार असल्याचे सीआयएबीसी म्हणजे ‘कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन अल्कोहोलिक बेव्हरेज कंपनीज’ ने म्हटले आहे.**

# मद्यावरील आयात शुल्क कपात
## भारतीय उद्योगांनाही फायदेशीर

■ नवी दिल्ली

**सीआयएबीसीच्या** मते, अनेक भारतीय उत्पादक ‘बॉटल्ड-इन-इंडिया’ उत्पादने तयार करण्यासाठी स्कॉचचा कच्चा




माल म्हणून वापर करतात. आयात शुल्क कमी झाल्यामुळे हा कच्चा माल स्वस्त होईल.

स्कॉच व्हिस्की आणि जिनवरील आयात शुल्क कमी झाल्याने जॉनी वॉकर आणि चिवास सारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँडच्या किमती १५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत म्हणजेच प्रति बाटली २२० ते ३०० रुपयांपर्यंत कमी होतील. ज्यामुळे मिश्रित मद्यांची गुणवत्ता सुधारेल आणि ते भारतीय ग्राहकांसाठी अधिक परवडणारे बनतील. तसेच आयात शुल्कातील कपात १० वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने लागू केली जाईल, ज्यामुळे देशांतर्गत उद्योग क्षेत्राला स्वतःच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी आणि स्पर्धेसाठी पुरेसा वेळ मिळणार आहे.

**पश्चिम रेल्वे**

**शुद्धीपत्रक**

ई-निविदा सूचना क्र. ८१२६५६४० दिनांक १०.०६.२०२६ करिता शुद्धीपत्रक

| प्रसिद्ध | आता असे वाचावे |
| --- | --- |
| काम आणि ठिकाण: एसएसई (सीॲण्डडब्ल्यू) वांद्रे टर्मिनस येथे चोरी-प्रतिबंधक व्यवस्थेसह अग्निशमन यंत्र (डीसीपी) चा पुरवठा. कामाची अंदाजित किंमत: ₹ ६५,०४,५१०.४. ईएमडी: ₹ १,३०,०१०/- | काम आणि ठिकाण: i) एसएसई (सीॲण्डडब्ल्यू) वांद्रे टर्मिनस येथे चोरी-प्रतिबंधक व्यवस्थेसह अग्निशमन यंत्र (डीसीपी) चा पुरवठा. ii) एसएसई (सीॲण्डडब्ल्यू) उधना येथे अग्नि शमन यंत्र ६ केजीचा पुरवठा. कामाची अंदाजित किंमत: ₹ ७४,६४,८४७.५२. ईएमडी: ₹ १,४९,३००/- |

इतर सर्व अटी आणि शर्तींमध्ये कोणताही बदल नाही. 0285

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा: X.xom/WesternRly